
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा



वर्ष पंचविसावे / अंक १२ / डिसेंबर २०२४

## संपादकीय

## जागतिक वारसा स्थळ 'शांती निकेतन'

डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मला शांती निकेतनला भेट देण्याचा योग आला. कलकत्त्यापासून सुमारे १५० किलोमीटरवर असलेले हे पवित्र ठिकाण आहे. पश्चिम बंगाल राज्यातील बोलपूर गावाजवळ असलेले हे ठिकाण निसर्गरम्य परिसरात वसलेले आहे. या विस्तीर्ण परिसरात मोठमोठी झाडे आणि लहान लहान इमारती आहेत. त्यातील एका घरात गुरूदेव रवींद्रनाथ टागोर राहत असत. हे घर अजूनही चांगले सांभाळून ठेवले आहे.गुरूदेवांनी वापरलेल्या वस्तू या इमारतीत पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. विशेष हे की, गुरूदेव वापरत असलेली परकीय बनावटीची कार अजून चांगल्या अवस्थेत आहे. गुरूदेवांच्या राहत्या घराशेजारीच असलेल्या एका मोठ्या इमारतीत मोठे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात गुरूदेवांनी रचलेल्या गीतांजली या महाकाव्याची सगळी कडवी लावून ठेवली आहेत. मूळ बंगाली भाषेत असलेल्या या कवितेचे इंग्रजी भाषांतर उपलब्ध करून देण्यात आले आहे. याच महाकाव्यासाठी गुरूदेवांना १९१३ मध्ये नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले होते. या पारितोषिकाची प्रतिकृती या प्रदर्शनात ठेवलेली आहे. त्याचबरोबर त्यांनी ज्या अनेक विदेश वाऱ्या केल्या त्याचीही माहिती या प्रदर्शनात दिलेली आहे. आपल्या कारकीर्दीत अनेक विचारवंतांना आणि शास्त्रज्ञांना गुरूदेव भेटले होते. त्याची छायाचित्रे देखील या प्रदर्शनात ठेवण्यात आलेली आहेत.

बोलपूर गावाजवळ असलेली ग्रामीण भागात असलेली ही जागा रवींद्रनाथ टागोरांच्या वडिलांनी घेतली होती. शहराच्या गजबजाटापासून शांत परिसरात असलेल्या या ठिकाणाला त्यांनीच शांती निकेतन हे नाव दिले. वयाच्या अठराव्या वर्षी रवींद्रनाथ वडिलांसोबत येथे पहिल्यांदा आहे. त्यांना हा परिसर खूपच आवडला. त्यामुळे त्यांचे इथे येणे वाढले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांनी याच परिसरात राहणाच्या निर्णय घेतला. निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण ही गुरूदेव टागोरांची क्रांतिकारक कल्पना होती. त्याबरहुकूम ते झाडाखाली वर्ग भरवित असत. हे वर्ग नेमके कसे होते हे पाहण्याची मला उत्सुकता होती. शिक्षण संकुलात आपण गेलो की असे वर्ग पाहायला मिळतात. गर्द झाडाच्या सावलीत एक गोलाकार चबुतरा बांधलेला असतो. त्यावर विद्यार्थ्यांनी बसायचे असते.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)


शिक्षकांसाठी वेगळा चबुतरा असतो. आमच्या मार्गदर्शकाच्या विनंतीवरून मी त्यावर विराजमान झालो. माझ्या पुढे सगळे प्रोढ विद्यार्थी होते. तेही ऑस्ट्रेलिया, मलेशिया, थायलंड या देशातून आलेले होते. या विद्यार्थ्यांना मी प्राचीन भारतीय गुरूकुल शिक्षण पद्धतीची माहिती दिली. त्याचबरोबर गुरूदेवांची शिक्षण प्रणाली गुरूकुल पद्धतीशी कशी मिळतीजुळती आहे हे समजावून सांगितले. शांती निकेतन मध्ये झाडाखाली बसून शिकविण्याचा हा अनुभव अवर्णनीय असाच होता.

आजूबाजूच्या परिसरातील काही मोजकी मुले घेऊन गुरूदेवांनी १९०१ मध्ये शाळेला सुरवात केली. त्यांचा मोठा मुलगा रतींद्रनाथ हा त्यांच्या शाळेच्या पहिल्या तुकडीचा विद्यार्थी होता. पाठ्यपुस्तकांखेरीज अनेक बाबींचे शिक्षण इथे दिले जायचे. कला शिक्षणाला इथे विशेष महत्त्व दिले जायचे. त्यामुळे विद्यार्थी संख्या वाढत गेली. आजही या परिसरात मोठ्या संख्येने शालेय शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी येतात. विद्यार्थ्यांची राहण्याची आणि शिक्षणाची सोय याच परिसरात करण्यात येते. कालमानाप्रमाणे त्यात बदल करण्यात आले आहेत. जवळच आम्हाला शाळेची इमारत दिसली. शालेय शिक्षणाने मूळ धरल्यानंतर गुरूदेवांनी शांती निकेतन मध्ये उच्च शिक्षणाची सुरुवात केली. १९२१ साली त्यांनी विश्व भारती नावाचे विश्वविद्यालय सुरू केले. शालेय आणि महाविद्यालयीन अशा दोन्ही स्तरांवर येथे कला शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. चित्रकला, नृत्य, नाटक, संगीत वाद्याचा वापर अशा प्रकारचे शिक्षण या संस्थेत दिले जाते. प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देण्यावर येथे भर आहे. 'रवींद्र संगीत' नावाची एक विशिष्ट संगीत प्रणाली आहे. तसेच रवींद्रनाथांनी सुरू केलेली एक स्वतंत्र चित्र प्रणाली आहे. या सगळ्यांचे या परिसरात शिक्षण दिले जाते. विश्व भारती या विद्यापीठाला १९५१ मध्ये केंद्रीय विद्यापीठ म्हणून मान्यता दिलेली आहे. पंतप्रधान हे या विद्यापीठाचे कुलपती असतात.

शांती निकेतन हे केवळ भारतातच नव्हे तर जगभर प्रसिद्ध असलेले ठिकाण आहे. या ठिकाणाचा जागतिक वारसा स्थानांच्या यादीत समावेश व्हावा यासाठी भारत सरकार अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत होते. २०१० मध्ये काही पुरावे जोडून भारत सरकारने युनेस्कोकडे अर्ज केला होता. त्याला युनेस्कोच्या तज्ज्ञ मंडळी कडून अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. पुनश्च एकदा भारत सरकारने आणखी काही पुराव्यानिशी २०२० मध्ये युनेस्को कडे अर्ज केला. या अर्जाला मात्र अनुकूल प्रतिसाद मिळाला. युनेस्कोच्या सर्वसाधारण सभेत बहुमताने ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार २०२३ पासून या स्थळाला जागतिक वारसा स्थळ असे संबोधण्यात येऊ लागले. आधीपासूनच या स्थळाला भेट देणाऱ्यांची संख्या मोठी होती. जागतिक वारसा स्थळ हे नामांकन मिळाल्यानंतर पर्यटकांची संख्या खूप वाढली आहे. आजच्या घडीला या ठिकाणाला दररोज हजारो पर्यटक भेट देत असतात.

शांती निकेतन जवळ दोन महत्त्वाची ठिकाणे आहे. त्यातील पहिले म्हणजे 'शिल्प ग्राम' हे होय. भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये आदिवासी समाज विखुरलेला आहे. त्यातील प्रत्येक समूहाचे काहीतरी वैशिष्ट्य आहे. आजूबाजूला मिळणाऱ्या वस्तू आणि पदार्थांचा उपयोग करून ते नवनवीन कलाकुसरीच्या वस्तू तयार करीत असतात. या वस्तूंचे एक मोठे प्रदर्शन या ग्रामशिल्प परिसरात

(पृष्ठ क्र. २१ वर)



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष पंचविसावे/अंक १२/डिसेंबर २०२४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | कवी ग्रेसचं मागणं | डॉ. श्रीपाद जोशी | २ |
| ३) | मतदानाचा हक्क मूलभूत हक्क- सर्वोच्च न्यायालयाची आणखी एक हमी | डॉ. श्रीविद्या जयकुमार | ५ |
| ४) | 'A La Carte अलास्का' | डॉ. जयश्री पवार | ९ |
| ५) | कोणार्क सूर्यमंदिराच्या अव्यक्त गोष्टी | दिलीप ना. वंडलकर | १३ |
| ६) | कर्ज लिया है..... | विनोद एच. वाघ | १९ |
| ७) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | २२ |
| ८) | 'संगीत बावनखणी'चा नवा प्रयोग : एक रुपवंत देखणी स्मृतिपूजा | प्रमोद वसंत बापट | २९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कवी ग्रेसचं मागणं

*प्रस्तुत लेखात मराठीतील ज्येष्ठ कवी ग्रेस यांच्याशी काव्यात्म संवाद साधलाय कवी श्रीपाद जोशी यांनी.*
*– संपादक*

गंगे गंगे
जान्हवी गे
माझे पाय ओढून घे
तुझ्या खोल
डोहामधली
एक भूल मला दे ....

काकुळतीला येऊन काहीतरी मागावं कुणाला. भौतिकाच्या पार काहीतरी मागावं. आज पहिल्यांदा लिहिताना 'प्रिय' हा शब्द सुरुवातीला न टाकता लिहायला घेतलं आहे. असं का केलं मी हे मला माहीत नाही. असं करताना मी कुठल्या प्रिय व्यक्तीला हाक मारतो आहे याचा मला क्षणभर उलगडा होत नव्हता, म्हणून असेल कदाचित. मला असे उगाचच वाटून गेले की मी आज ग्रेस सरांशी बोलणार आहे. असं वाटता वाटता मी त्यांच्या संपर्कक्षेत्राबाहेर गेलो. हे बाहेर जाणं काही सेकंदात घडलं. मग वाटलं की तुलाच काहीतरी सांगावं. तसही बरेच दिवस झालेत, आपण बोललो नाही. सर संपर्कक्षेत्राबाहेर गेलेत की मी दूर गेलो याचा उलगडा यानिमित्ताने आज मला करायचा आहे. मोठा कठीण काळ आहे. सारं काही आलबेल असताना मनावरची कोणती जखम ठणकत असते? बधिरतेची तीव्रता कमी झालेली नसते. त्या बधिरतेसोबत जगायला आपण सरावतो आणि त्याचं काहीच वाटेनासं होतं असं वाटायचे हे दिवस. साडेचार महिन्यांच्या माझ्या मुलाला त्याला छातीला बिलगवून त्याच्याशी खेळताना मी त्याला तो मुलगा असला तरी लाडाने 'तू माझी गंगी आहे ना..? तू माझी बकुळा आहे ना..? तू माझी उमा आहे ना...?' अशी काही नावं घेऊन त्याच्याशी खेळत असतो. हे ऐकून बायको म्हणत असते – 'बोलवा मग तुमच्या गंगीला घरी काम करायला.. मलाही कुणीतरी मदत करायला पाहिजेच आहे.' अशा अनेक संध्याकाळी 'गंगे' चा जप केल्यानंतर मला गंगा, बकुळा आणि उमा यांच्या उगमाचा शोध लागला. हा शोध लागल्याबरोबर मला हायसं वाटलं आणि थोड्याच वेळात प्रचंड उदासी भोवती दाटली. उगमाचा हेवा वाटावा असाच उगम आहे तो. माझ्या साडे-चार महिन्याच्या मुलाला झोपवताना मी ग्रेस सरांची कविता ब्याग्राउंडला लावलीसुद्धा :

गंगे गंगे
जान्हवी गे
माझे पाय ओढून घे
तुझ्या खोल
डोहामधली
एक भूल मला दे ....

सुरुवातीला तुला म्हणालो ना, तसा काकुळतीला आलो. एरव्ही संध्याकाळी घरात 'शुभंकरोती' लावून, माझ्या आवडत्या मोगऱ्याच्या अगरबत्तीने मी माझी 'भूल' मिटवून टाकतो. फार रममाण होऊन बोलत नसलो तरी नेटाने संसार करावा इतका घरात असतोच की मी! मग तरीही आज चकवा कसा काय बसला ? आज 'शुभंकरोती'ची जागा' गंगे गंगे जान्हवी गे..' ह्या स्तोत्राने माझ्याही नकळत कशी काय घेतली? कुठल्या

क्षणाला अंगावर काटा उमटला ? कुठल्या क्षणाला डोळे ओले झाले ? कुठल्या क्षणाला झोळीतलं रडणारं माझं साडे-चार महिन्याचं बाळ शांत होऊन 'गंगे गंगे जान्हवी गे..' ऐकू लागलं? नाही सांगता येणार. मला फक्त इतकंच आठवतं की, तो बोलक्या डोळ्यांनी शांत होऊन त्याचं बोळकं उघडं ठेवून ऐकत होता. 'गंगे गंगे जान्हवी गे..' आणि मी ? मी 'गंगे गंगे जान्हवी गे..' ऐकताना कुठेतरी दूर प्रवासाला गेलो होतो. मी गंगेला आर्जव करत होतो की, 'तुझ्या खोल डोहामधली एक भूल मला दे ....'

हे सगळं होत असताना गंगा मात्र अविचल शांतपणे वाहत होती. मला स्वच्छ, नितळ पाणी दिसत होतं प्रवासात. माझा प्रवास प्रवाहासोबत सुरू होता?, की प्रवाह माझ्यासोबत प्रवास करत होता हे कळायच्या आत संध्याकाळ तेव्हा अंगावर यायची तशी अंगावर आली आणि मी काकुळतीला येऊन बोलून गेलो: 'तुझ्या खोल डोहामधली एक भूल मला दे ....'

हवं तसं सगळं घडत असताना माझ्या मुलाच्या म्हणजे राघवच्या डोळ्यात मला खोल डोह दिसला. मला भूल कशाची पडली माहीत नाही, पण माझे ओले डोळे जणू राघव पुसत होता इतका शांत आणि धीरगंभीर होऊन तो झोळीतून बाहेर येण्यासाठी धडपडू लागला. मी मात्र प्रवासातच त्याला बघत होतो. त्याला झोळीतून बाहेर काढायचं भानसुद्धा मला राहिलं नाही. कदाचित तो रडला असता तर मी त्याला बाहेर काढला असता. पण त्याने आरडाओरडा केला नाही की तो रडला नाही. त्याने मला गंगेची भूल घेऊ दिली. तेवढ्यात शब्द कानावर पडले:

गंगे गंगे
जान्हवी गे
माझ्या कळ्या विखरून टाक
पाठीमागे
सूर्य गेला
तरी नाही माझी हाक...

हे शब्द कानावर पडले तसा मी दचकलो, पण तरीही भानावर नाही आलो. ह्या ओळीतल्या 'कळ्या' ह्या शब्दाने माझ्या मनात उलथापालथ केली. मी तुला म्हणालो ना की साधंसरळ सोपं नाही मागायचं मला. मी सुद्धा गंगेला ओल्या डोळ्यांनी पुन्हा याचना केली की 'माझ्या कळ्या विखरून टाक...' हे मागणं मागताना गॅलरीतील सगळी झाडे गलबलल्याचा भास मला झाला आणि माझ्या संतापाचा कडेलोट झाला. घरच्यांचं , दारच्यांचं कुणाचंही काहीही कधीही खटकू शकतं मला, आणि माझा भडका उडू शकतो हे माहीत असल्याने घरचे नादाला लागत नाही. पण माझी पोरगी मात्र नादाला लागते. आत्ता ह्या क्षणाला लिहिता लिहिता ती माझ्या खोलीत येऊन गेली. मला म्हणे, 'बाबा तुम्हाला भूक नाही लागली का? मग म्हणे मला बेड करून द्या.' मग म्हणे 'मला टीव्ही लावून द्या.' ह्या सगळ्यात माझी लिहिण्याची तंद्री संपू नये म्हणून मी पूर्वी चिडायचो. आता मुकाट्याने न चिडता तिला बेड करून दिला. टीव्ही लावून दिला. पुन्हा लिहायला बसलो. आता ह्याला कुणी समंजसपणा म्हणत असेल तर ते साफ चूक आहे. 'आत' मी चिडतच असतो; कारण मी पूर्वीइतकाच हरामखोर आहे.फक्त ही घुसमट घेऊन मी काही काळ जगू शकतो. केव्हातरी भडका उडतो. पोरांवर मी चिडत नाही . त्यामुळे ते सेफ असतात. तरीही आत्ता पोरगी म्हणून गेली. ''बाबा तुम्ही चिडले नाही ना...?'' मी फक्त 'नाही' म्हणालो. तेव्हड्यावरच ती काय ते समजून निघून गेली दुसऱ्या खोलीत. कुणावरही आणि कशामुळेही चिडू शकतो मी. दिवाळीच्या सुट्टीत काही दिवस गावी गेलो तेव्हा शेजारणीला बायकोने झाडाला पाणी घालायला सांगितलं होतं. ती विसरून

गेली. मी गावाहून आलो तेव्हा काही जळून खाक झालेली झाडं पाहून माझा काय संताप झाला हे मलाच माहीत. ह्या बाईचा नवरा पेंटर असतानाही हिला एका कवीला काय दुःख होऊ शकतं ह्याची जाणीव झाली नसावी ? मी तिला काहीच बोललो नाही. बायकोला सुद्धा काहीच म्हणालो नाही. घुसमटून काही दिवस उरल्यासुरल्या झाडांना पाणी घालत बसलो आणि आज ह्या कवितेची ओळ समोर आली : माझ्या कळ्या विखरून टाक.. पाठीमागे सूर्य गेला, तरी नाही माझी हाक...

कुणाला हाक मारू अशा वेळी? कोण समजून घेणार मला अशावेळी? कोण पुसणार माझे डोळे? कोण समजून घेणार खोट्या कारणामागचं खरं कारण? माझ्या हाती काय उरतं अशा वेळी ? फक्त आर्त हाक: 'गंगे गंगे जान्हवी गे'

पुढच्या ओळी अंगावर यायला लागल्या :

गंगे गंगे  
जान्हवी गे  
काठावरचा वारा  
हाडांनाही  
पिळून घेता  
नको डोळी धारा...

कुणालाच दुःख नको. कशाचेच. पण हे शक्य नाही. काठावर राहून सुखाची अपक्षा करत करत दुःख कवटाळत बसतो आपण. वेळी अवेळी वाहण्याऱ्या डोळ्यातल्या धारांना कुणीच नाही, अगदी मी सुद्धा अशावेळी रोखू शकत नाही.

गंगे गंगे  
जान्हवी गे  
पूर येता कसे?  
पाण्यामध्ये  
निजती का  
पाण्यातले मासे?

तुला-मला पाण्याबाहेर घुसमटणारे मासे माहीत आहेत. पण ग्रेस सर त्यांच्याबद्दल बोलत नाही. सर बोलतात पुरातल्या माशांबद्दल. नेस्तनाभूत होताना कसली आली नीज?

कुणीच नको वाटते जवळ अशावेळी. अगदी मी सुद्धा माझ्याजवळ नको असतो मला. कारण मला पैलतीराची ओढ लागते.

गंगे गंगे  
जान्हवी गे  
पैलतीरी काय  
उतू गेल्या  
दुधावरची  
मला नको साय...

तूर्तास माझं दूध उतू गेलं नाहीये ह्याने मला बरं वाटतं. माझी दोन्ही पोरं पैलतीरावरून मला हाक देतात आणि मी पुन्हा माणसात येतो. मला साय नकोच आहे. फक्त दूध उतू जाऊ नये एवढंच आज काकुळतीला येऊन मागणं आहे. बाकी सगळं ठीक.

**- डॉ. श्रीपाद जोशी**  
सहाय्यक प्राध्यापक,  
इंग्रजी विभाग, सी टी बोरा महाविद्यालय,  
शिरूर, पुणे

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*  
**०२२-२५४२ ६२७०**

# मतदानाचा हक्क मूलभूत हक्क- सर्वोच्च न्यायालयाची आणखी एक हमी

*आपल्याला इतर हक्कांप्रमाणेच मतदानाचा हक्कदेखील प्रदान करण्यात आला आहे, याचे आपण कर्तव्यपालन केले पाहिजे. याविषयी काही सैद्धांतिक माहिती सांगणारा लेख - संपादक*

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्राला नवीन विधानसभा आणि नवीन सरकार मिळेल. याच वर्षी १८ व्या लोकसभा निवडणुका पार पडल्या. आपल्या देशाने ५४३ जागांसाठी ९० कोटीहून अधिक पात्र मतदारांसह आणखी एक भव्य सार्वत्रिक निवडणूक अनुभवली. फक्त एक वर्षापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने एका जनहीत याचिकेवर निकाल देताना, ज्यात भारताच्या निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीसाठी समिती कशी असावी याबद्दल निर्णय दिला गेला होता, ह्याच याचिकेमध्ये मतदानाचा हक्क 'मूलभूत हक्क' म्हणून घोषित केला. या लेखात मतदानाचा हक्क 'मूलभूत हक्क' म्हणून ओळखला जाण्यासाठी झालेल्या घडामोडींचा मागोवा घेतला आहे.

## पार्श्वभूमी

अनूप बरणवाल विरुद्ध भारत संघ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने भारताच्या निवडणूक आयोगाच्या नेमणुकीवर निर्णय देताना, संविधानातील अनुच्छेद १४२ अंतर्गत त्याच्या अधिकारांचा वापर करून संविधानातील मौनाचा अर्थ उलगडवून दाखवला. हा निर्णय मतदानाचा हक्क एक मूलभूत हक्क म्हणून ओळखणे ह्यासाठी विशेष हस्तक्षेपाची आवश्यकता दर्शवणारा ठरला.

सर्वोच्च न्यायालयाने मत देण्याचा हक्क हा नागरिकाच्या निवडीची अभिव्यक्ती आहे असे ठरवले आहे, जो अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत एक मूलभूत हक्क आहे. लोकांच्या भवितव्यावर परिणाम करणारे एक अनिवार्य साधन म्हणून या हक्काचा दावा करताना, न्यायालयाने सांगितले की, तो अनुच्छेद २१ मध्ये प्रतिबिंबित होतो. महिलांचा आणि संविधानाद्वारे संरक्षित वंचित वर्गांचा मतदानाचा हक्क आठवण करून देत, न्यायालयाने निर्णय दिला की मतदानाचा हक्क केवळ अनुच्छेद ३२६ पुरता मर्यादित नाही, तर तो अनुच्छेद १५,१७,१९ आणि २१ यांच्या माध्यमातून प्रवाहित होतो. न्यायालयाने एक महत्त्वाची घोषणा केली की, अनुच्छेद ३२६ द्वारा निर्धारित मर्यादांच्या अधीन राहून, थेट निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क हा एक मूलभूत हक्क आहे.

## भारताचे संविधान

जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीचे संविधान मतदानाचा हक्क स्पष्टपणे मूलभूत हक्क म्हणून पारित करत नाही. लोकशाहीची प्रारंभीची वचनबद्धता स्वायत्त निवडणूक आयोगाच्या तरतुदींनी, केंद्र आणि राज्यांमध्ये निवडून आलेल्या विधानसभांच्या रचनेने आणि त्यांच्या कालावधीने तसेच निवडून आलेल्या सदस्यांच्या पात्रता व विशेषाधिकारांनी बळकट केली आहे. परंतु, आपल्या संविधानातील मूलभूत अधिकारांच्या भागात मतदानाचा महत्त्वाचा राजकीय हक्क लक्षणीयरीत्या अनुपस्थित आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, बी. एन. राव यांच्या अहवालात, घटक सभेच्या मूलभूत अधिकार समितीसाठी के. एम. मुंशी यांच्या अहवालात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटक सभेच्या सल्लागार समितीकडे सादर केलेल्या निवेदनात नागरिकांचा अधिकार म्हणून मतदानाचा हक्क समाविष्ट होता. मात्र, जानेवारी १९४७ मध्ये एका अंतरिम अहवालावर, निवडणुकांवरील

सर्व तरतुदी एका स्वतंत्र भागात असाव्यात असा प्रस्ताव मांडण्यात आला आणि त्यामुळेच हा हक्क भाग III - मूलभूत अधिकार भागातून वगळला गेला.

चुकलेले संसदीय प्रयत्न-संविधानातील निवडणुकीवरील भाग दत अनुच्छेद ३२६च्या माध्यमातून १८ वर्षे व त्यावरील सर्व नागरिकांना, जे अनिवास, मानसिक अस्थिरता, गुन्हा, भ्रष्ट किंवा अवैध प्रथा यांसारख्या कारणांमुळे अपात्र नसतील, मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्रता हमी देतो. अनुच्छेद ३२५ राज्याला केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा यापैकी कोणत्याही आधारावर कोणत्याही नागरिकाला मतदार यादीत समाविष्ट करण्यास नकार देण्यास प्रतिबंधित करतो.

१९८५ मध्ये ५२ व्या घटना दुरुस्तीने जेव्हा पक्षांतर विरोधी कायदा आणला गेला आणि १९८९ मध्ये ६१ व्या घटनादुरुस्तीने मतदानाचे वय २१ वरून १८ वर्षांवर आणण्यात आले, तेव्हा मतदानाचा हक्क मूलभूत हक्क म्हणून मिळवण्याचा कोणताही प्रयत्न झाला नाही. पक्षांतर विरोधी कायदा त्या नागरिकांच्या अपेक्षांना आदर देतो ज्यांनी उमेदवाराला त्यांच्या पक्षाशी असलेल्या संलग्नतेच्या आधारे मत दिले आहे. मात्र, मतदाराने उमेदवाराच्या व्यक्तिगत गुणवत्तेवर किंवा उमेदवाराच्या पक्षाच्या गुणवत्तेवर मतदान केले आहे का, हे प्रत्यक्षात ठरवण्याची कोणतीही पद्धत नाही. निश्चितपणे, पक्षांतर विरोधी कायदा सरकारच्या स्थिरतेवर आधारित होता. वय कमी करण्याचा उद्देश लोकशाहीमध्ये निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी वाढवणे होता. परंतु, मतदानाचा हक्क मूलभूत हक्क म्हणून मान्यता न मिळणे असेच सुरू राहिले.

लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी आरक्षणाचा कालावधी वाढवण्यासाठी जेव्हा प्रत्येक वेळी संविधानात दुरुस्ती करण्यात आली, तेव्हा मतदानाचा हक्क मूलभूत हक्क म्हणून ओळखण्याची संधी साधली गेली नाही. पंचायत आणि महापालिका यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा समावेश करण्यासाठी ७३व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्त्यांद्वारे संविधानात दुरुस्ती केली तेव्हाही ही संधी गमावली गेली. या दुरुस्त्यांद्वारे पंचायत आणि नगरपालिकांसाठी थेट निवडणुकांची तरतूद करण्यात आली होती. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३% आरक्षणाची हमी देणाऱ्या १०६ व्या दुरुस्तीने देखील या देशातील नागरिकांच्या मतदानाच्या हक्काला मूलभूत हक्क म्हणून प्रकाशात आणले नाही.

न्यायिक प्रयत्न-सुप्रीम कोर्टाने पुनःपुन्हा असे ठरवले की मतदानाचा हक्क फक्त एक कायदेशीर हक्क आहे. अनुच्छेद ३२५आणि ३२६मध्ये मतदानाचा हक्क स्पष्टपणे दिला असतानाही, सुप्रीम कोर्टाने दुर्दैवाने मतदानाच्या हक्काला संविधानाअंतर्गत राजकीय हक्क म्हणून स्वीकारले नाही आणि त्याला केवळ कायदेशीर हक्क मान्य केला, जो त्यावर लादलेल्या मर्यादांनुसार अस्तित्वात आहे.२००३मध्ये पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात, उमेदवारांना माहिती देण्याच्या कर्तव्यावर विचार करताना, कोर्टाने मतदानाचा हक्क केवळ एक कायदेशीर हक्क असल्याचा दावाही नाकारला. कोर्टाने स्पष्टपणे असे ठरवले की, जर तो मूलभूत हक्क नसेल, तर तो निश्चितपणे एक संविधानिक हक्क आहे. तसेच, देसिया मुरपोक्कु द्राविड कळागम विरुद्ध निवडणूक आयोग या प्रकरणात बहुमत न्यायाधीशांनी अल्पमताच्या त्या मताशी सहमत होत, देशातील प्रत्येक नागरिकाला संविधानिक हक्क म्हणून निवडण्याचा आणि निवडले जाण्याचा हक्क आहे, असे स्पष्ट केले. राजबाला आणि इतर विरुद्ध हरियाणा राज्य या प्रकरणात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, मतदानाचा हक्क सांविधानिक हक्क आहे हा निर्णय देतांना सुप्रीम

कोर्टाने पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज आणि डीएमडीके मध्ये दिलेल्या निर्णयाच्या आधार घेतला आणि सामान्य निवडणुकीतील मतदानाचा हक्क संविधानिक हक्क म्हणून पुनःस्पष्ट केला. तसेच, श्यामदेव प्रसाद सिंग विरुद्ध नवल किशोर यादव आणि के. कृष्णा मूर्ती विरुद्ध भारत सरकार या प्रकरणातील हे निरीक्षण, की मतदानाचा हक्क आणि निवडणूक लढण्याचा हक्क केवळ कायदेशीर हक्क आहे हा निर्णय, उच्च न्यायालयात योग्य पद्धतीने विचार करून दिलेला नसलेला आहे(पेर इन्कुरियम) ठरवले.

२०२३मध्ये सुप्रीम कोर्टाने मतदानाचा हक्क अनुच्छेद १५, १७, १९ आणि २१ सोबत अनुच्छेद ३२६ वाचून एक हक्क म्हणून ओळखला. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यासाठी स्वतंत्र शिफारस करणाऱ्या संस्थेची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेमध्ये हे मान्य केले.

सुप्रीम कोर्टाने निवडणुकीत उमेदवारांचे शैक्षणिक पात्रता, संपत्ती, शिक्षापद्धती, प्रलंबित अपराधाचे आरोप याबद्दल मतदारांना माहिती मिळवण्याचा हक्क ओळखल्यामुळे त्याचा अत्यंत सकारात्मक परिणाम झाला आहे. सुप्रीम कोर्टाने दिव्यांग व्यक्तींना मतदान हक्क प्रत्यक्षात मिळवून देण्यासाठी रॅम्प, ब्रेल मतदान यंत्रे आणि त्यांची विशेष गरज लक्षात घेत कर्मचारी संवेदनशीलतेसह सुविधा प्रदान केल्या. २०२४च्या लोकसभा आणि राज्य विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाने वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना घरून मतदान करण्याची सुविधा दिली आहे.

तसेच, २०१६पासून मतदारांना नोटा (वरील पैकी कुणीच नाही) निवडण्याचा हक्क आहे, जर त्या मतदारसंघातील उमेदवारांचे कोणतेही उमेदवार त्यांचा मत स्वीकारण्यास पात्र नसेल, असे सुप्रीम कोर्टाने पी.यु.सी.एल.विरुद्ध भारत सरकार या निर्णयात ठरवले आहे. तथापि, आजतागायत, जर नोटानिवडून येते, तर पुन्हा निवडणूक घेण्याचा हक्क नाही तर नोटानंतर ज्या उम्मेद्वारास सर्वात जास्त मत मिळाली त्यास विजेता घोषित केले जाते.

अनिवासी भारतीय (एन.आर.आय.) चा हक्क – २०१०मध्ये १९५१च्या लोकप्रतिनिधी कायद्यात कलम २०अ मध्ये सुधारणा करून, पात्र असलेल्या अनिवासी भारतीयांची नोंदणी करण्याची व्यवस्था केली गेली. अनिवासी भारतीय ऑनलाइन नोंदणी करू शकतात. तथापि, अनिवासी भारतीय केवळ भारतात येऊनच निवडणुकीत मतदान करू शकतात. नागेंद्र चिंदम विरुद्ध भारत सरकार आणि निवडणूक आयोग प्रकरणात, एक सार्वजनिक हितासाठी (प्रो बोनो) याचिकाकर्त्याने परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी अनुपस्थित मतदान हक्काची मागणी केली. सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार, एक समिती नेमली गेली ज्याने अनुपस्थित मतदानाची कार्यप्रणाली तपासून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. निवडणूक आयोगाने ई-पोस्टल बॅलट सिस्टीम सादर केली; त्यानंतर प्रतिनिधी (प्रॉक्सी) मतदानाची प्रस्तावना केली.

आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या साधनांनी जसे की मानवी हक्काची सार्वत्रिक घोषणा (यु.डी.एच.आर.), नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करार (आय.सी.सी.पी.आर.), आणि महिलांवरील सर्व प्रकारच्या भेदभावाच्या निर्मूलनासाठीचे अधिवेशन (सी.इ.डी.ए.डब्ल्यू) यांनी त्यांच्या देशांमध्ये मतदानाचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून दिलेला आहे. युरोपीय, अमेरिकन आणि आफ्रिकन प्रदेशांतील साधनांनी देखील या हक्काला मान्यता दिली आहे. सुप्रीम कोर्ट नेहमीच आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या न्यायशास्त्राकडे पाहून मूलभूत अधिकारांचे विवेचन करत आहे. नागरिकांच्या

मतदान हक्काची नवीन ओळख हे एक महत्त्वाचे आणि परिवर्तनात्मक बदल आहे.

निवडणूक बंधपत्रे आणि माहिती मिळवण्याचा हक्क – अलीकडे ए.डी.आर.विरुद्ध भारत सरकार मध्ये सुप्रीम कोर्टाने निवडणूक बंधपत्र योजना अ-संवैधानिक ठरवली, कारण ती लोकांच्या माहिती मिळवण्याच्या हक्काचे उल्लंघन करत होती. मतदारांच्या माहिती जाणण्याचा हक्काने राजकीय पक्षांच्या निधीमध्ये गुप्तता पेक्षा जास्त महत्त्व दिले. हा निर्णय निवडणूक राजकारणातील पैशाच्या ताकदी आणि बळाचा प्रभाव कमी करण्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

मोबाईल मतदान – चालू निवडणुकांमध्ये ८५ वर्षांहून अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांग व्यक्तींना घरून मतदान करण्याची सुविधा प्रदान करण्यात आली आहे. हे एक मोठे पाऊल पुढे टाकले गेले आहे.

मतदानाची सत्यता तपासण्याचा हक्क – एका जनहित याचिकेत, ए.डी.आर.विरुद्ध निवडणूक आयोग आणि इतरांमध्ये, याचिकाकर्त्यांनी पारंपरिक कागदी मतपत्रिका परत आणण्याची किंवा मतदारांना व्हि.व्हि.पी.ए.ए.टी.स्लिप घेऊन बॉक्समध्ये ठेवण्याची परवानगी देण्याची मागणी केली. याचिकाकर्त्यांचा दावा होता की, मतदारांना त्यांचे मतदान नोंदवले गेले म्हणून' आणि 'जशास तसे मोजले म्हणून' तपासण्याचा मूलभूत हक्क आहे, आणि अशा हक्काची घोषणा करण्याची मागणी केली. २६ एप्रिल २०२४ रोजीच्या आपल्या निर्णयात, सुप्रीम कोर्टाने इ.व्हि.एम. (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) चा पाठिंबा दिला आणि १००% प्रती सत्यापन आणि पारंपरिक मतपेटी प्रणालीत परत जाण्याची मागणी नाकारली. सुप्रीम कोर्टाने निरीक्षण केले की, इ.व्हि.एम. मतदान योग्य प्रकारे मतदारांच्या अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत हक्काची पूर्तता करते, ज्यामध्ये मतदाराला माहिती असणे आवश्यक आहे की, त्याचे मतदान जशास तसे मोजले गेले आहे. तथापि, सुप्रीम कोर्टाने म्हटले की, निवडणुकांनंतर सर्व यंत्रणा तपासल्या पाहिजेत की त्यात कोणतीही छेडछाड झाली आहे का, याची पडताळणी करण्यासाठी आणि हे याचिका दाखल करणाऱ्या उमेदवारांनी, ज्यांनी दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले आहे, सात दिवसांच्या आत लेखी मागणी केल्यास तपासणी केली जाईल. जर छेडछाड आढळली नाही तर याची किंमत याचिकाकर्त्यांवर असेल.

भारताच्या लोकशाहीचा जयजयकार!!

**– डॉ. श्रीविद्या जयकुमार**
प्रभारी प्राचार्य,
व्हीपीएमचे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे
(मूळ लेख इंग्रजीत)

**– डॉ. रुपाली श्याम जामोदे**
सहाय्यक प्राध्यापक,
व्हीपीएमचे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे
(मराठीत भाषांतर)

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# 'A La Carte अलास्का'

*मे २०२४ मध्ये पृथ्वीवरील नंदनवन 'अलास्का' प्रदेशाची सफर केली. ही सहल आयोजित करण्यापासून, ते सहल पूर्ण होईपर्यंत खूप आनंद मिळाला. तो सर्वांबरोबर वाटून द्विगुणित करावा अस वाटलं, म्हणून हा लेखप्रपंच. 'A La Carte अलास्का!' या लेखमालेचा हा दुसरा भाग. – संपादक*

**२. स्वप्नवत गाव: तलकीतना**

प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी आम्ही 'तलकीतना' (Talkeetna) या शहराला रेल्वेने भेट देणार होतो. 'अलास्का रेल' ही गौरवशाली इतिहास असलेली जगप्रसिद्ध रेल सेवा आहे. यावर्षी ती आपलें शताब्दी वर्ष साजरे करत आहे. या डोंगराळ प्रदेशात, गोठवणाऱ्या थंडीत, शंभर वर्षांपूर्वी रेल्वे मार्ग बांधणे किती जिकिरीचे काम असेल याची कल्पनाच केलेली बरी! १९२३ साली हे आश्चर्य प्रत्यक्षात प्रवाशांच्या सेवेत रुजू झाले तेव्हापासून अलास्काच्या इतिहासाचा ते मूक साक्षीदार राहिलेले आहे. काळ बदलला, नवीन तंत्रज्ञान आले, तशी अनेक स्थित्यंतरे त्याने अनुभवली. प्रवाशांच्या सोयीसाठी नवनवीन बदल केले गेले. आजमितिला 'aurora winter', 'Denali star', 'coastal classic', 'glaciar discovery', 'hurricane summer' आणि 'hurricane winter' असे सहा पर्याय रेल्वे आरक्षणाच्या वेळी उपलब्ध आहेत. आपण कोणत्या ऋतूत प्रवास करतोय, व कोणत्या शहराला भेट देतोय, त्याप्रमाणे योग्य पर्याय निवडून आपण आरक्षण करू शकतो. हा रेल मार्ग इतका विलोभनीय आहे, की अलास्का सहलीत एकदा तरी हा अनुभव घ्यायलाच हवा!

आम्ही 'देनाली स्टार रूट'वर 'अँकरेज ते तलकीतना' हा प्रवास करणार होतो. मे चा शेवटचा आठवडा ते सप्टेंबर हा येथे अत्यंत वर्दळीचा कालावधी असतो. त्यामुळे या काळात प्रवास करायचा असेल तर आरक्षण साधारण दोन महिने आधी केलेले उत्तम!

आरक्षण करताना 'एडवेंचर क्लास' व 'गोल्ड स्टार' असे दोन पर्याय उपलब्ध आहेत. गोल्ड स्टार क्लासचे तिकीट एडवेंचर क्लास पेक्षा सुमारे दुपटीने महाग आहे. वरच्या मजल्यावर असलेल्या गोल्ड स्टार सीट्स पूर्णपणे पारदर्शक खिडक्या व घुमटाकार छताने आच्छादलेल्या कक्षामध्ये असतात. त्यामुळे मनमोहक निसर्गाचा चहूबाजूनी आनंद घेता येतो. हा अनुभव घेताना 'complementary meal', ज्याची किंमत तिकिटातच अंतर्भूत असते, आपल्याला पुरवले जाते.

एडवेंचर क्लास सीट्स खालच्या मजल्यावर असतात. काचेच्या भव्य खिडक्या असल्यामुळे येथेही एका अद्भुत प्रवासाचे साक्षीदार आपण होऊ शकतो. याशिवाय ॲडव्हेंचर क्लासचे तिकीट असले तरी गोल्डस्टर मजल्यावर जागा रिकामी असल्यास तिकडेही आपण आसनस्थ होऊ शकतो.

ट्रेनच्या एका डब्यात उपहारगृहाची व्यवस्था आहे. मोठ्या खिडकी शेजारी बसून, बाहेरचा मनोहारी देखावा मनात साठवत, आपल्या प्रियजनांसोबत गप्पागोष्टी करत आवडीच्या पदार्थांचा आस्वाद घेण्याचा अनुभव केवळ अवर्णनीय आहे.

आमची गाडी सकाळी ८.२०ला सुटणार होती. तिकिटावर लिहिल्याप्रमाणे वेळेच्या सुमारे एक तास आधी स्टेशनवर पोहोचलो. आमचे ऑनलाईन बुकिंग दाखवून बोर्डिंग पासेस घेतले आणि आजूबाजूला फेरफटका मारला. स्टेशन समोरच अलास्का रेल्वेचे

खूप जुने इंजिन ठेवलेले आहे. त्याच्या सोबत मस्त फोटो काढले. परिसरातच रेल्वेचे गिफ्ट शॉप आहे. अलास्का रेल रोड नकाशा, त्यावरील पुस्तके, लहान मुलांची अलास्का वरील गोष्टींची पुस्तके, खेळण्यातल्या बोगद्यातून धावणाऱ्या रेल गाड्या.... अबब! माझा भाचा अद्विकच नव्हे, तर मी सुद्धा हरखून गेले. स्टेशनवर छोटेखानी उपहारगृह आहे. तेथे मस्त गरमागरम कॉफी प्यायलो. एक तास कसा गेला कळलेच नाही. आमची गाडी आल्याची उद्‌घोषणा झाली आणि आम्ही त्या दिशेने चालू लागलो. गाडीत आसनस्थ झालो. रेल कर्मचाऱ्यांनी सुहास्यवदनांनी आमचे स्वागत केले.



गाडी सुटली. आजूबाजूच्यापरिसराची माहिती सतत उद्घोषणेद्वारे दिली जात होती. थोडं पुढे गेल्यावर 'Elmendorf Air Force Base' आणि 'Fort Richardson' असे संयुक्त लष्करी तळ लागले. आणखी थोडं पुढे गेल्यावर निक नदी दिसू लागली. ईगल नदी, बर्चवूड, चुगियक व पीटर्स खाडी, एकलुटना नदी व लगतचे छोटेखानी गावही बघितले. एकलुटना तलाव ॲन्करेज शहराला पाणीपुरवठा करतो ही माहितीही मिळाली. आमची झुकझुकगाडी माटानुस्का नदी, चुगाह (Chugah) पर्वतरांगा, सुसितना (Susitna) पर्वत यांमधून मार्गक्रमण करत होती. तशा घोषणाही होत होत्या. येथील अत्यंत सुपीक प्रदेश- माटानुस्का नदीचे खोरे, ज्याला मात्सु खोरे असेही म्हणतात, दिसू लागले.

घोषणांद्वारे ही नावे जरी आमच्या कानावर पडत असली, तरी खरं सांगायचं तर आजूबाजूचा परिसर इतका मोहक होता की, तो शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य आहे. एका बाजूला बर्फाच्छादित पर्वतरांगांवर सूर्याचे सोनेरी किरण पडले होते आणि त्यामुळे त्या पर्वतरांगां जास्तच तेजस्वी दिसत होत्या; तर दुसऱ्या बाजूला संथ वाहणारी नदी. अक्षरशः नक्की कुठे बघावं तेच कळत नव्हतं. प्रवासिनी देवीची आजही आमच्यावर कृपादृष्टी होती, म्हणूनच की काय, अजिबात मळभ नव्हतं, लख्ख सूर्यप्रकाश पडला होता, आणि हे मनोहरी दृश्य आम्ही मनात साठवून ठेवत होतो. 'अनंत हस्ते कमलाकराने देता, किती घेशील दो करांनी'. नव्हे 'दो चक्षुनी' अशी आमची अवस्था न झाल्यास नवल काय!

साधारण दीड तास प्रवास झाल्यावर आम्ही 'वसीला' स्टेशनवर पोहोचलो. मात्सु खोरे, अप्रतिम निसर्ग सौंदर्य आणि तलावांचे शहर म्हणून वसीला प्रसिद्ध आहे.

किनाऱ्यालगतचा प्रदेश असल्यामुळे अलास्का मध्ये मासे पकडणे हा केवळ व्यवसायच नव्हे, तर अत्यंत आवडीचा छंद देखील आहे. एखादी दिवशी मोटारगाडी घेऊन कुटुंबकबिल्यासहित बाहेर पडावे, सृष्टी सौंदर्याचा मनमुराद आनंद घ्यावा, मासे पकडावेत आणि त्याच माशांवर जेवणात ताव मारावा हे अलास्कन लोकांसाठी परमसुख आहे असं म्हणायला हरकत नाही. वसीला सुद्धा मासेमारीसाठी मशहूर आहे.

मूस नावाचा हरणासारखा प्राणी, अस्वले, bald eagles, डॉल शिप नावाच्या मेंढ्या, लांडगे, कॅरीबू जातीचे हरिण इत्यादी वन्य प्राण्यांचे दर्शन हा अलास्का सफरीचा एक महत्त्वाचा भाग. यातील काही दृष्टीस पडतात का याकडे सगळे लक्ष ठेवून होते. रेल कर्मचारीही काही दिसले तर आम्हाला येऊन सांगत होते. एक दोन वेळा हरीण दिसल्याचा ओरडा झाला खरा; पण आम्हाला मात्र फारसे प्राणी आढळले नाहीत. वसीला नंतर गाडी विलो शहराच्या स्टेशनवर काही मिनिटे

थांबली. थोड्याच वेळात सुसिटना नदीच्या काठाकाठाने प्रवास करत आम्ही तलकीतनाला पोचलो.

स्टेशनवर उतरलो आणि थंडगार हवा व बर्फाच्छादित डोंगरांनी आमचे पुन्हा एकदा स्वागत केले. स्टेशनला लगतच असलेल्या रस्त्यावरून आम्ही चालायला सुरुवात केली. नुकतीच बर्फवृष्टी झाली असावी. रस्त्याच्या कडेला साठलेले बर्फ दिसत होते. थोड पुढे गेल्यावर घरंआणि हॉटेल्स दिसू लागली. सुंदर लाकडी टुमदार घरे, आणि स्वागताला 'टोटेम पोल्स'. 'ही वाट दूर जाते; स्वप्नामधील गावा' या ओळी गुणगुणतच या स्वप्नवत गावातून आम्ही पुढे चालू लागलो.

टोटेम पोल्स-घराबाहेर उभारलेले लाकडी खांब हे अलास्कन लोकांचा सांस्कृतिक वारसा आहेत. हा त्यांचा एक कुळाचारच आहे म्हणा ना! त्या त्या कुळाचाराप्रमाणे हा खांब कुठच्या लाकडाचा असावा, किती उंच असावा, त्यावर काय चितारावे ते ठरते. कधी एकच खांब असतो तर कधी दोन. अलास्कामधील प्राणी, पक्षी कोरलेले पाहून त्यांची निसर्गाशी जुळलेली नाळ जाणवते. बऱ्याचदा याचबरोबर एखादी कुळातली कथा, कुलपुरुषाची माहिती इत्यादीही कोरले जातात. सुबकपणे कोरलेले हे खांब अलास्कन लोकांची कलासक्ती व कोरीव कामातील प्रावीण्य यांचे प्रतीकच आहेत. सहसा सिडार लाकडाचे बनवलेले हे खांब घराचे वाईट शक्तींपासून रक्षण करतात असे मानले जाते. पूर्वी ते कळपाच्या म्होरक्याच्या घराबाहेरच असत. आता बऱ्याच अलास्कन घरांबाहेर ते बघायला मिळतात. सुबक टुमदार लाकडी घरांची ते शोभा वाढवतात हे मात्र नक्की. आपल्या स्वागतासाठी ही घरे कायम सुसज्ज आहेत; असंच मला हे टोटेम पोल्स पाहून वाटत आलं आहे.





**टोटेम पोल्स**

या स्वप्नातील गावातल्या मोहक रस्त्यावरून चालता चालता मुख्य चौकात आलो. काही रेस्टॉरंट्स इथे पाहुण्यांच्या स्वागतासाठी सज्ज होती. आम्ही सकाळी नाश्ता केला नव्हता. त्यामुळे पोटात कावळे कोकलत होतेच. शाकाहारी भोजन कुठे मिळते का ते पाहत होतो, आणि 'माऊंटन हाय पिझ्झा पाय' (Mountain High Pizza Pie) या हॉटेलशी येऊन थांबलो. लाकडी बैठ्या घरात सजवलेलं हे हॉटेल. आत व बाहेर निवांत रेंगाळण्यासाठी आरामदायी आसन व्यवस्था होती. बऱ्यापैकी गर्दी असूनही तत्पर सेवा मनात भरली. मी खरं तर 'pizza fan' नव्हे! पण आम्ही मागवलेला व्हेज पिझ्झा अत्यंत चविष्ट होता. त्याचबरोबर मागवलेली 'freshly brewed' कॉफी सुद्धा. छोटे खानी हॉटेल; पण फक्त दोन महिला सर्व पसारा उत्तमरीत्या आणि हसतमुखाने सांभाळत होत्या. घरी बेक केलेला केक सुद्धा स्वादिष्ट होता. विशेष म्हणजे एवढ्या छोट्याशा गावात, छोट्या हॉटेलमध्ये त्यांच्या प्रत्येक विक्री मालावर त्यांचा विशिष्ट लोगो छापलेला होता. हा लोगो असलेले मग, पाण्याच्या बाटल्या, की चेन्स इत्यादी विक्रीसाठी ठेवले होते. मी खूप रमून गेले या ठिकाणी.

उदरभरण करून आम्ही थोडे पुढे आलो. तलकीतना हे जेमतेम हजार बाराशे लोकवस्तीचे अलास्कामधील खूप छोटे जुने गाव आहे. तलकीतना म्हणजे संगम.

सुसितना, चुलीतना आणि तलकीतना या तीन नद्यांच्या संगमावर हे मनोहरी गाव वसले आहे. सुप्रसिद्ध देनाली नॅशनल पार्क या पर्यटन स्थळाच्या अगदी जवळ. इतके, की तलकीतनाला 'देनालीचे प्रवेशद्वार' मानले जाते. येथील अनेक इमारती 'ऐतिहासिक वास्तू' आहेत. बहुतांश प्रदेश बर्फाच्छादित असल्यामुळे 'हेलिकॉप्टर लँडिंग टूर्स' आणि 'डॉग स्लेडींग टूर्स' साठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे सुसितना नदीवर बोटिंग, कयाकिंग, मासे पकडणे यासाठीही लोक विशेषत्वाने येथे येतात. कालच दिवसभर विमान प्रवास झाल्यामुळे आजचा दिवस खरंतर आम्ही विश्रांतीसाठी ठेवला होता. कुठच्याही ऍक्टिव्हिटीसाठी पूर्व आरक्षण केले नव्हते. जेवून बाहेर पडेपर्यंत साडे-बारा होऊन गेले. चालत चालत पुढे गेलो. एका लाकडी केबिन मध्ये डॉग स्लेडींगची पाटी वाचली आणि तिकडे मोर्चा वळवला. पण त्यांची शेवटची बॅच नुकतीच रवाना झाली होती; त्यामुळे आमची ही संधी हुकली.

चालत आणखी पुढे गेलो 'River Walk' ची पाटी वाचली आणि त्या दिशेने चालू लागलो. नदी किनारा, आल्हाददायक हवा, जमिनीवर विखुरलेले बर्फ, आणि लांबवर बर्फाच्छादित हिमशिखरे! चॉकलेटी पर्वत व वरती पांढरे शुभ्र हिम; त्यामुळे त्यांना 'marshmellows in brown chocolate' म्हणतात!



**तलकीतना-स्वप्नवत गाव**

मुंबईत माझा दिनक्रम अतिशय व्यस्त असतो. इकडे मिळालेला निवांतपणा आणि हा स्वर्गीय माहोल! दूरवर देनालीची सोनेरी शिखरे देखील दिसली. आम्ही वेळेअभावी देनाली सफर करणार नव्हतो. दुरून का होईना; या सुप्रसिद्ध पर्वतरांगेचे दर्शन झाले म्हणून आम्ही खुश झालो. तलकीतनातील हा फेरफटका कायम स्मरणात राहील.

फेरफटका झाल्यावर गरमागरम फ्रेंच फ्राईज आणि आईसक्रीम गट्टम केले आणि परतीच्या वाटेला लागलो. रस्त्यावरील दुकानांमध्ये विंडो शॉपिंग केले. अलास्का मध्ये एक बाब विशेषत्वाने जाणवली ती म्हणजे बंदूक बाळगण्याच्या परवान्याची नसलेली गरज. अनेक वस्तूंप्रमाणे बंदूका देखील दुकानात मांडून ठेवलेल्या होत्या. अलास्कामध्ये काही प्रमाणात शहरीकरण झाले असले, तरी आजूबाजूच्या जंगलातून रानटी प्राणी शहरांमध्ये येतात. अस्वलांचे हल्ले तर मोठ्या प्रमाणात होतात. ही अस्वले घरात शिरून नासधूस तर करतातच; शिवाय आबालवृद्धांनाही धोकादायक असतात. अस्वलांना रोखण्यासाठी बेअर स्प्रे वापरात आहेत. मिरची पावडर व साबण यांचे मिश्रण असलेले हे द्रव्य काही प्रमाणात प्रभावी असले, तरी अस्वल जर खूपच आक्रमक असेल तर स्व-संरक्षणासाठी त्याची हत्या स्थानिक अलास्कन करू शकतात. या कारणासाठी येथे बंदूक बाळगण्याच्या परवान्याची स्थानिक लोकांना गरज नसते. अमेरिकेत बेसुमार गोळीबार होऊन हत्या होतात हे वाचले होते. त्या पार्श्वभूमीवर परवान्याशिवाय बंदूक वापरणे किती धोकादायक ठरू शकते असा विचार मात्र मनात आल्यापासून राहिला नाही!

अलास्का मधील आणखी एक रंजक बाब या रेल प्रवासात कळली. अलास्का मधील अनेक भाग

(पृष्ठ क्र. १८ वर)


# कोणार्क सूर्यमंदिराच्या अव्यक्त गोष्टी

*कोणार्क हे सूर्यमंदिरासाठी प्रसिद्ध असले तरी तेथील सौरघड्याळांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून घेतलेली विस्तृत माहिती, मंदिराच्या बाह्यांगावर 'नारीशक्ती'चा उदोउदो करणारी शिल्पे आणि राजा नृसिंहदेव - प्रथम यांनी ती कां व कशासाठी कोरवून घेतली याचे विवेचन, मंदिराच्या संरचनेत महाकाय चुंबकाचे कार्य, तसेच हे मंदिर विस्मृतीत गेले असताना त्यास गतवैभव परत मिळवून देण्यात नागपूरचे राजे रघुजी भोसले - प्रथम यांचे योगदान.. या सर्व बाबींचा या लेखात गोषवारा घेण्यात आला आहे. - संपादक*

साल इ.स. १७५०. नव्यानेच साम्राज्यात दाखल झालेल्या ओरिसा प्रांतातील कटकच्या किल्ल्यातील सदरेवर बसून राजे रघुजी भोसले - प्रथम यांचे कारभाऱ्यांना सांगून संरक्षण, महसूल, रस्ते व पुल बांधणी, सिंचनाच्या सोयी, शेतकरी व रयतेचे प्रश्न अशा नानाविध विषयांवर मंत्र्यांशी विचारविनिमय करून प्रजेच्या हितासाठी करावयाच्या उपाययोजना क्रियांवित करण्याचे विविध हुकूम भराभर जारी करण्यात येऊ लागले. राजे जसे रणांगणावर अग्रहक्काने पुढे राहायचे तसेच ते उसंत मिळताच मुलकी कारभारातही जातीने लक्ष घालायचे. नव्हे तसा त्यांचा तो शिरस्ताच होता. अशा व्यग्र कार्यक्रमात अमात्य हळूच राजांच्या कानात कांहीतरी कुजबुजले. राजांचा चेहरा आनंदाने फुलून आला. आघाडीच्या स्वारांना गंतव्य स्थानी लगेच रवाना करण्यात आले. उर्वरित कामे तातडीने उरकून खासे घोड्यावर बसून निघून गेले. गंतव्य स्थानी आधीच उपस्थित असलेल्या कारभाऱ्यांनी राजांचे स्वागत करून त्यांना वाळूत रुतलेला स्तंभ दाखवला. स्तंभास नमन करून लागलीच संपूर्ण जागा खणून काढण्याचा हुकूम राजांनी जारी केला. राजे जातीने उपस्थित राहून कामावर देखरेख ठेवू लागले. या खणनातून स्तंभासोबतच आधी कळस व नंतर संपूर्ण मंदिर दिसू लागले.

हे क्षेत्र होते आजचे कोणार्क! पूर्वीचे अर्कक्षेत्र वा पद्मक्षेत्र (अर्क म्हणजे किनारा) आज या क्षेत्राची एकच विशिष्ट ओळख आहे आणि ती म्हणजे जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले येथील सूर्यमंदिर. प्रसिद्ध 'गंगा' राजवटीत सातव्या शतकापासून भुवनेश्वर या राजधानीच्या शहरातील लहान-मोठ्या शिल्पांपासून सुरू झालेल्या कलिंग पद्धतीच्या स्थापत्य रचनेचा प्रवास तेराव्या शतकात नृसिंहदेव - पहिला (इ स. १२३७ ते १२६४) या पराक्रमी राजाच्या काळात या भव्य मंदिराच्या उभारणीत झाला.

या मंदिरास १० एप्रिल २०२४ रोजी प्रत्यक्षात भेट देण्याचा योग घडवून आणला तो मुलगा चि. ओजसने घडवून आणलेल्या पर्यटन सोहळ्यामुळे.



**सूर्यमंदिरातील रथाचे एक चाक**

शहाणपण हे फक्त परिस्थिती हाताळण्यात नाही, तर विचार करण्याच्या दृष्टिकोनात आहे.

मंदिराची रचना सात अश्व जुंपलेल्या आणि बारा जोडी चाके असलेल्या रथावर आरूढ होऊन सूर्यदेव प्रवासासाठी निघाला असल्याच्या कल्पनेवर आधारित आहे. आजच्या घडीला सातपैकी तीनच अश्व अस्तित्त्वात असून रथाची सर्व चाके शाबूत ठेवण्यात पुरातत्त्व खात्यास यश मिळाले आहे.

मंदिराच्या पायथ्याशी दगडात कोरलेली चाके ही केवळ सूर्यरथाची चाके नसून ती सौरघड्याळे आहेत. सूर्यप्रकाशामुळे पडणाऱ्या सावलीच्या मदतीने दिवसा अचूक वेळ सांगणे शक्य आहे. चाकांवर असलेले कोरीव काम सारख्याच घाटणीचे असले तरी यातल्या प्रत्येक चाकावर वेगवेगळ्या देवतांची रूपे आणि नक्षत्रे कोरण्यात आल्याने ती थोड्याफार फरकाने वेगवेगळी आहेत. चाकांच्या बारा जोड्या बारा महिने दर्शवितात; आणि चोवीस चाके चोवीस तास, तर रथाचे सात अश्व आठवडा दर्शवतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. या चाकांना आठ आरे (स्पोक) आहेत. याचा अर्थ, दिवसाच्या चोवीस तासांचे विभाजन आठ प्रहरांमध्ये केले आहे. प्रत्येक प्रहर तीन तासांचा! म्हणजेच प्रत्येक दोन आऱ्यांमधील अंतर तीन तासांचा कालावधी दर्शवते. या आठ मुख्य आऱ्यांच्या दरम्यान कमी जाडीचे आणखी आठ आरे आहेत. म्हणजेच प्रत्येक तीन तासांच्या कालावधीचे विभाजन दीड - दीड तासांमध्ये म्हणजे ९० मिनिटांमध्ये केले आहे. चाकाच्या कडेवर पुरेशा मोठ्या आकाराचे दगडी मणी आहेत. क्रमाने येणारा प्रत्येक मोठा आरा आणि लहान आरा यांच्या दरम्यान असलेल्या दगडी मण्यांची संख्या तीस आहे. याचाच अर्थ, प्रत्येक नव्वद मिनिटांच्या कालावधीसाठी तीस मणी कोरलेले आहेत. त्यामुळे दोन मण्यांच्या दरम्यानचा कालावधी हा तीन मिनिटांचा आहे.

चाकाच्या अक्षालगद जर एखादी काडी आपण धरली तर काठीची सावली कुठे पडते यावरून आपण तेंव्हाची वेळ सांगू शकतो. मण्यांची संख्या जर लक्षात घेतली तर या घड्याळाचा वापर करून, तीन मिनिटांपर्यंत अचूक वेळ सांगणे शक्य आहे. म्हणजेच शास्त्रीय भाषेत, या घड्याळाचे लघुत्तम माप हे तीन मिनिटे आहे. मात्र दगडी मणी आकाराने मोठे असल्याने मण्यांचे तीन समान भाग कल्पून आपण एका मिनिटांपर्यंत वेळ सांगू शकतो.

मंदिराच्या पूर्वेला असलेल्या चाकांचा वापर सूर्योदयापासून मध्यानापर्यंतची वेळ सांगण्यासाठी आणि मंदिराच्या पश्चिमेला असलेल्या अशाच प्रकारच्या चाकांचा वापर माध्यान्हापासून सूर्यास्तापर्यंतची वेळ सांगण्यासाठी केला जाऊ शकतो. (सध्या चलनात असलेल्या दहा रुपयाच्या नोटेवर यापैकी एक चाक चित्रीत करण्यात आले आहे.)


प्रस्तुत मंदिराचे बांधकाम इ.स. १२३८ ते १२५० या १२ वर्षांच्या काळात १२ एकर क्षेत्रावर १२०० कारागिरांच्या साहाय्याने करण्यात आले असून, त्या काळात यासाठी चाळीस कोटी सुवर्णमुद्रा खर्च आला, हे येथील शिलालेखावरून समजून येते. या मंदिराच्या सभोवती किल्लेवजा भक्कम परकोट असून त्यास चारही दिशांनी चार प्रवेशद्वारे होती. मुख्य मंदिराव्यतिरिक्त छाया आणि माया अशा सूर्यदेवाच्या दोन भार्यांची मंदिरे आणि देवतेला प्रसाद अर्पण करण्यासाठी भव्य मुदपाकखाना आणि पाण्याची सोय म्हणून बांधण्यात आलेली बावली आजही आवारात सुस्थितीत आहे.

पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वारातून आंत शिरताच समोर दिसते ते नटमंडप वा नृत्यमंडप. यास शिखर नाही. नृत्यगृहाच्या प्रवेशापाशीच एक उत्कृष्ट शिल्प आपले लक्ष वेधून घेते. यात मदमस्त हत्ती गरिब माणसाला पायदळी तुडवत असून हत्तीच्या पाठीवर चवताळलेला सिंह त्याचा कपाळमोक्ष करीत असतांना आणि त्या हल्ल्याने भयभीत होऊन हत्तीस पाय वाकवून खाली

बसावे लागत असल्याचे दिसते. एवढंच काय तर, 'एखाद्याने मस्तीच्या भरात दृष्कृत्य केल्यास कधीतरी शेरास सव्वाशेर भेटून त्याचा माज उतरवला जाऊ शकतो' असा बोध या शिल्पातून दिला गेला आहे!

नृत्यमंडपात सालंकृत नृत्यांगना सकाळच्या कोवळ्या उन्हात सूर्यदेवासमोर नृत्य करायच्या. नृत्यगृहाची रचना अशा पद्धतीने करण्यात आलेली आहे की, सूर्यप्रकाश या स्थानी परावर्तीत होऊन आधी मंडपगृहात व नंतर मागच्या गर्भगृहातील सूर्यदेवाच्या मूर्तीस उजळून टाकायचा. त्यातच नृत्यांगणांचा बिलोरी पेहराव, दागदागिने व जवाहिऱ्यांवरून परावर्तीत होणारे असंख्य लहानमोठ्या, रंगबिरंगी कवडश्यांच्या सूवर्णशलाकांनी संपूर्ण गर्भगृह मोरपंखी रंगात न्हाऊन निघायचा. सध्या मंडप बंद स्थितीत असून गर्भगृह नसल्याने आपणास त्या सप्तरंगी सोहळ्याची फक्त कल्पनाच करता येऊ शकते.

मंडप आणि नृत्यशालेच्या बाह्यांगावर महिला संबंधित शेकडो शिल्पे कोरलेली आहेत. त्यांच्या हालचालींचा मनमोहक वेध या शिल्पांत घेण्यात आला आहे. उदा. पहाटे अंथरुणातून उठून बसल्यानंतर देवाचे नामस्मरण करणारी नाममुद्रा, दोन्ही हात वर करून व दोन्ही हातांची बोटे एकमेकांत अडकवून आळस झटकून देण्यासाठी केलेली मुद्रा, आंघोळीच्या आधी दासीकडून उबटन लावणे, स्नानानंतरचे सौंदर्यवर्धन, त्यानंतर दागदागिने लेवून व वस्त्रे परिधान केल्यानंतर आरशात बघून स्वतःच्या सौंदर्याचा आनंद घेतांनाची मुद्रा, अश्वारूढ होऊन रपेट मारतांना व रपेट पूर्ण झाल्यावर पाय धुऊन घेणे आणि आजच्या भाषेत सांगायचे तर पेडीक्यूयर, मेरीक्यूअर, मेकअप आदी दासींकडून करवून घेणे, हत्तीवरून राणीची निघालेली मिरवणूक, न्यायदान करण्यापूर्वी राजाचे राणीचा अंतिम विचार घेणारी मुद्रा, राजा हजर नसतांना राणीने मृत्यूदंडाची शिक्षा स्वतःच्या अखत्यारीत अंमलात आणणारी घटना आदी राणीवसा व राजकीय घटनांची शिल्पे मनमोहून घेतात.



**बाह्य भिंतींवरील विविध शिल्पे**

या खेरीज सामान्य महिलांचीसुद्धा रेखीव शिल्पे या ठिकाणी बघायला मिळतात. उदा. झाडाखाली चूल मांडून अन्न शिजवणारी महिला, (कोणार्क येथील बांधकामात वापरलेले दगड सुमारे ३०० कि. मी. अंतरावरील बालासोर येथून त्या काळी बैलबंड्यांनी आणल्या जायचे. हा प्रवास बरेच दिवस चालायचा. तेव्हा निवाऱ्याच्या जागी असा स्वयंपाक व्हायचा.), प्रवासासाठी लागणाऱ्या चिजवस्तू डोक्यावर लादून कच्च्या - बच्च्यासहीत वाटचाल करणारी स्त्री, दूरवर गेलेल्या पतीची घरातील चौकटीच्या आत राहून आणि पदर डोक्यावर घेऊन दाराआडून वाट बघणारी म्हणजे कौटुंबिक मर्यादेत राहणारी स्त्री, ही सगळी शिल्पे डोळ्यांची पारणे फेडीत असतात. या खेरीज नटमंडपावर ओडीसी, भरतनाट्यम, कुचिपुडी, मणिपुरी, मोहिनीअट्टम आदी

भारतीय नृत्यातील विविध मुद्रा व त्या अनुषंगाने त्यांना गायन-वादनात साथसंगत करणाऱ्या महिलांच्या अनेक शिल्पमुद्रा लक्षवेधी ठरतात. भरीसभर म्हणजे यातील एका शिल्पात सध्या प्रचलित असलेला तोकडा फ्रॉक हा वस्त्रप्रावरणाचा स्त्रियांनी वा मुलींनी पेहराव म्हणून घालून नृत्यात सहभागी होण्याचा प्रकार तेराव्या शतकात सर्रास वापरल्या जात होता, हे स्पष्ट होते.

या शिवाय एकदोन स्थानी चिनी ड्रॅगन आणि नागशिल्पे आढळतात. यावरून चिनी आणि भारतीय शिल्पकारांचा मंदिर उभारणीत सहभाग होता, हे समजून येते.

सूर्यमंदिर बांधून त्याच्या बाह्य भिंतींवर महिलांची अनेक शिल्पे कोरण्याची कल्पना नृसिंहदेवास कशी सुचली..! यांचा मागोवा घेतांना समजून येते की, या राजाची आई परम सूर्यभक्त होती आणि त्याच्या उपासनेतूनच तिला पुत्र प्राप्ती झाली, या मतावर ठाम होती.



**मंदिरावर अंधांतरी असलेले ५३ टन वजनाचे चुंबक**

तेव्हा आईच्या इच्छेखातर नृसिंहदेवाने हे मंदिर उभारले. त्यातच कलिंग हा देश पूर्वापारपासून संघराज्य/ गणराज्य म्हणून अस्तित्वात होता. प्रजेला स्वातंत्र्य होते. राज्यकारभारात महिलांचे सुद्धा योगदान असायचे. पण त्या योगदानात राजघराण्यापासून सामान्य स्त्री ते नृत्यांगनापावेतो या सर्वांची वाटचाल शिल्पीत करणारा राजा विरळाच. त्याचे हे कार्य सदोदित लक्षात राहील. केलेल्या कामाची कुठेही वाच्यता नाही की साधा शिलालेख नाही. तेंव्हा 'सब कुछ नारी' या शब्दांच्या गौरवार्थ कार्य करणाऱ्या राजास त्रिवार मुजरा..!

मंदिराचे गर्भगृह अस्तित्वात नाही. मात्र, ते जेव्हा होते त्यावेळी मंदिराची उंची २२७ फूट होती व ते कलिंग देशातील सर्वात उंच मंदिर होते. त्यास कळसाच्या आंत आणि बाहेर असे दोन शक्तीशाली चुंबके एकमेकांना दूर सारणाऱ्या पद्धतीने बसविण्यात आली होती. त्यामुळे गाभाऱ्यातील सूर्यदेवतेची मूर्ती आणि वरचे चुंबक हे अंधांतरी राहायचे. या दोन्ही चुंबकांचे एकत्रित वजन ५३ टन होते. त्यांची चुंबकीय शक्ती एवढी जबरदस्त होती की, बाजूच्या समुद्रातून वहन करण्याऱ्या जहाजांची दिशादर्शक यंत्रणा कोलमडून पडायची.

हे मंदिर आपोआप ढासळले, की यवनांच्या आक्रमणातून त्याची नासधूस झाली वा इंग्रजांनी त्याचा विध्वंस केला अथवा दैवी आपत्तीतून विनाश झाला?, याबाबत अनेक मतांतरे आहेत. यवनी आक्रमणातून मंदिरातील कितीतरी लहानसहान देवळांची तोडफोड झाली, ही शक्यता नाकारता येत नाही. स्थानिकांच्या मते इंग्रजांनी १९०३ साली कळसावरील चुंबक बलपूर्वक हटवला; त्यामुळे मंदिराच्या संरचनेची एकत्र बांधून ठेवणारी यंत्रणा नाहीशी होऊन मंदिराचे दगड व मूर्त्या कोसळून भंग पावल्या. (सूर्यदेवतेची गाभाऱ्यातील भंग झालेली मूर्ती दिल्ली स्थित राष्ट्रीय संग्रहालयात सुरक्षित ठेवलेली आहे.) मात्र, पुरातत्त्व खात्यातील उपलब्ध

पुरावे आणि जे. फर्ग्युसन यांनी १८३७ साली काढलेल्या चित्रावरून हे मंदिर इ.स. १९०३ सालच्या कितीतरी आधी ढासळल्याचे स्पष्ट होते. या चित्रात गाभारा असलेल्या मंदिराचा कळस भंग झालेला दिसत असून सध्या अस्तित्त्वात असलेल्या मंडपाची तेव्हढी क्षती झाली नसल्याचे समजून येते. पुरातत्त्व खात्यानुसार भयानक वादळीवाऱ्यासह विजेचा प्रचंड लोळ मंदिराच्या शिखरावर आदळला. त्यात झालेल्या स्फोटाने मंदिराचे दगड विद्युतवेगाने इतस्ततः फेकले गेलेत. (दगडांचे हे अवशेष मंदिराच्या अवतीभवती सुमारे २ कि.मी. परिघात विखुरलेले होते.) इंग्रजांनी हे भग्नावशेष इ.स. १९०२ ते १९०६ च्या दरम्यान एकत्र करण्याचा प्रयत्न केला. या काळात दिरंगाई होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या काळात उद्भवलेली महामारी.



**जे. फर्ग्युसन यांनी काढलेले इ.स.१८३७ सालचे चित्र**

इंग्रजांना मंजूर मिळेनासे झाले होते. थोडक्यात, इंग्रजांनी हे मंदिर पाडले हा समज चुकीचा असून, कोणार्कचे सूर्यमंदिर दैवी आपत्तीतून नेस्तनाबूत झाल्याचे स्पष्ट होते. (सौजन्य - डॉ. अरुण मलिक, अधिक्षक, पुरातत्व खाते, नागपूर)

कालांतराने मंदिराचे अवशेष समुद्रावरून वाऱ्यासोबत येणाऱ्या वाळूत गाडल्या गेलेत व हे मंदिर लोकांच्या स्मृतीआडसुद्धा झाले.

पुढे स्थिती पालटली. उत्तरेत पेशव्यांनी तर दक्षिणेत नागपूरच्या भोसल्यांनी मराठी अंमल बसवला. नागपूरचे राजे रघुजी भोसले (प्रथम) यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी इ. स. १७३९ ते १७५० पर्यंतच्या काळात बंगाल प्रांतावर अनेक स्वाऱ्या केल्या. (तेव्हाचा बंगाल प्रांत म्हणजे आजच बिहार, झारखंड, बांगलादेश, ओरिसा आणि प. बंगाल एवढा विस्तीर्ण भूभाग.) सततच्या आक्रमणामुळे बंगालचा नबाब अलिवर्दिखान मेटाकुटीला आला. शेवटी त्याने १७५० साली बंगाल प्रांताची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार व सोबत अख्खे ओरिसा राज्य मराठ्यांच्या हवाली केले.

ओरिसा ताब्यात आल्यावर मराठ्यांचे कारभारी चोख अंमलबजावणीसाठी राज्यभर फिरू लागले. अशातच ते एके ठिकाणी विश्रांतीसाठी थांबत. या कालावधीत घोड्यांचा चारापाणी करून झाल्यानंतर त्यांना तेथील नक्षीदार खांबांना बांधत. या खांबांची वार्ता श्रीमंतांना कळविण्यात आली. राजांचे कुतूहल जागृत झाले. उत्सुकतेने जागेवर हजर झाले आणि तो परिसर खणून काढण्याचा हुकूम जारी केला. खणण्यातून खांबांसोबतच मंदिराचा कळस दिसून आला. जसजसे हे खोदकाम होत गेले तसतसे त्यातून नक्षीदार सूर्यमंदिर बाहेर पडू लागले. पुढे रघुजी राजांनी या मंदिराचा जिर्णोद्धार करीत त्याच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतला. खणण्यातून सापडलेल्या दोन अरुण स्तंभापैकी एक नागपूर या त्यांच्या राजधानीच्या मुक्कामी हलवण्याचा विचार राजांच्या मनात आला. मात्र, तो हलवतांना त्यांना अनेक अशुभ घटनांना सामोरे जावे लागले. शेवटी ३४ फूट उंचीचा हा स्तंभ पुरी येथील जगन्नाथ भगवान मंदिराच्या परिसरात महाद्वारापासून २५ फूट अंतरावर स्थापित केला.

सध्या प्रभात, मध्यान्ह, सूर्यास्त हे तीन प्रहर दर्शविणाऱ्या सूर्यदेवाच्या खंडित, पण कधीकाळी

अस्तित्वात असलेल्या प्रतिमा मंडपाच्या बाह्य भागावर बसवण्याचे, तसेच मंदिर समुद्रसपाटीपासून खाली असल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठीची व्यवस्था पुरातत्त्व खात्याने पूर्णत्वास नेली आहे. वनखात्यानेसुद्धा मंदिर व समुद्रकिनारा यातील मधल्या जागेत कॅझ्यूरानाची झाडे लावून वाऱ्यासोबत रेती वाहून येण्याच्या घटनेला लगाम घातला आहे.

असो, मंदिरावर वर्तमानानं चहूबाजूंनी अंमल बसवला असला तरीही सगळंच कांही संपलेलं आहे, असं मुळीच नाही. मूळ दगड आणि शिल्पं अजूनही तोच प्राचीन स्पर्श जपून आहेत. स्तंभावरच्या नक्षीची लय आणि मंदिराची आत्ममग्नताही भंगलेली नाही. प्राकारातल्या झाडांवरून चंद्राचा कालातीत प्रकाश येतो; तेंव्हा मंदिराचे दगड जिवंत होतात आणि दोघांनाही आपोआप समजतं ते युगाचे मौन! त्यांना आठवतो राजा नृसिंहदेव - पहिला याची महिलांविषयीचा आदर, मातेविषयीचे प्रेम; त्यांना आठवते ती राजे रघुजी भोसल्यांना मंदिराबाबत लागलेली 'हुरहुर' .. ! कारण त्यांनी इथवर वाहून आणला आहे त्या माणसांचा स्पर्श आणि कोणेएकेकाळच्या माणसांच्या कथा, त्यांचं मन, त्यांचा इतिहास, त्यांची संस्कृती! ही दगडं आहेत त्या संपन्न साम्राज्यांची, त्या माणसांची, त्यांच्या जगण्याची संस्कृतीची कथा सांगणारी प्रतीकं..! त्या माणसांचं असणं जेवढं या भूमीनं साजरं केलं तेवढंच त्यांच्या नसण्याचं स्मरणही या मंदिराच्या रूपानं त्यांनी देखणं केलं आहे.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

•••

(पृष्ठ क्र.१२ वरून - '**A La Carte अलास्का**')

आजही इतके दुर्गम आहेत की रेल रोड अथवा रस्ता बांधणे शक्य नाही; या ठिकाणी केवळ हवाई मार्गाने पोहोचता येते! हवाई मार्गाने अलास्का अनुभवणाऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. त्यामुळे येथे बऱ्याच लोकांकडे खाजगी विमाने आहेत. छोट्या विमानातून हिमनदीवर उतरून मग 'डॉग स्लेडींग'चा अनुभव देणाऱ्या अनेक टूर्स उपलब्ध आहेत. 'दर हजार माणसांमागे बारा विमाने' इतक्या मोठ्या प्रमाणात अलास्कन्स अशी छोटी विमाने बाळगतात. जगात यासाठी अलास्का खास करून ओळखले जाते. तलकीतना रेल स्टेशन जवळ अनेक छोटी विमाने उड्डाण करताना व उतरताना आम्हाला जवळून पाहता आली.

सुंदर दिवसाच्या आठवणी मनात साठवत परतीची ट्रेन पकडली. ट्रेनमध्ये बसलो आणि निसर्गाचा अजून एक चमत्कार बघितला. साधारण साडेसात-आठ वाजले असतील. मंद प्रकाशात परतीच्या वाटेवर सकाळचे सोन्याने मढलेले हिमाच्छादित पर्वत आता रुप्याच्या विविध छटांमध्ये न्हाऊन निघत होते. त्यांच्यावरून नजर हटेना! त्यांच्या रम्य सोबतीने अँकरेज गाठलं. हॉटेलवर आलो आणि दिवसभराच्या स्वप्नवत आठवणी मनात घोळवत निद्रादेवीच्या स्वाधीन झालो!

**- डॉ. जयश्री पवार**
सहाय्यक प्राध्यापिका
जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे

•••

# कर्ज लिया है.....

*'कर्ज' हा आज अनेकांच्या आयुष्याचा अपरिहार्य भाग झाला आहे. पण त्यातील मानसिकता, सुरक्षितता इ. अनेक मुद्यांचा विचार करणं अत्यावश्यक आहे. या संदर्भातील हा लेख. - संपादक*

उर्दू शायरीची सुरुवात करताना शायर 'अर्ज किया है...' अशा वाक्याने शायरीची सुरुवात करतो आणि प्रेक्षक त्यास 'इर्शाद' असे उत्तर देऊन शायरास प्रतिसाद देतात. आज मात्र प्रत्येक व्यक्तीला काहीतरी कारणास्तव 'कर्ज लिया है...' असे म्हणण्याची वेळ आली आहे. ऑनलाईनच्या या जगात कर्ज मिळविणे फारच सोपे झाले आहे. फारच सोपे झाले असल्याकारणाने प्रत्येक व्यक्तीच्या अंगावर स्वत:चे असे कर्ज आहे. त्यामुळे जवळपास प्रत्येक व्यक्ती कर्जाचा मासिक हप्त्याच्या विळाख्यात अडकून पडला आहे. नोकरी किंवा व्यवसाय करण्याचा उद्देश फक्त या छोट्या-मोठ्या वित्तीय संस्थेच्या कर्जाचे हफ्ते फेडण्यासाठी असतो अशी नवीन जीवन-पद्धती आपण स्वीकारली आहे. या जीवन पद्धतीत आपल्या सर्वांचे स्वागत आपण स्वतःच करूया व कर्ज आणि कर्जाच्या हप्त्याच्या अडकून पडलेल्या व त्यातच हप्ते न फेडू शकणाऱ्या सामान्य माणसाची व्यथा ऐकुया. तर, अर्ज किया है....सॉरी, कर्ज लिया है...

२२ नोव्हेंबर २०२४ च्या फिनान्शियल एक्सप्रेसच्या बातमीप्रमाणे भारतातील एकूण लोकसंख्येच्या ६७% लोकांच्या नावावर विविध प्रकारचे कर्ज आहे. यामध्ये गृह कर्जापासून, घर सजावटीसाठीचे, व्यक्तिगत, शैक्षणिक, विदेशवारीसाठीचे, वाहन, वस्तूवरील कर्जाचा समावेश आहे. या व्यतिरिक्त शेती, व्यापार, व्यवसाय यासाठीची कर्जे आहेतच.

कर्ज घेण्याच्या कारणात खरे तर जागण्याची आवश्यकता नसली पाहिजे, कारण कर्ज तेव्हाच घेतले जाते किंवा घ्यायला पाहिजे जेव्हा कर्जाशिवाय दुसरा मार्ग उपलब्ध नसतो. परंतु बदललेली जीवन पद्धती आज प्रत्येकाला कर्ज घेण्यास भाग पाडत आहे. महागडी गाडी पासून ते महागडे मोबाइल फोन या जीवनासाठी आवश्यक नसलेल्या वस्तूवर सर्वाधिक कर्ज घेतले जाते. गंमत म्हणजे अनेक कंपन्या कर्ज फेडण्यासाठी कर्ज देतात. याशिवाय क्रेडिट कार्ड तर प्रत्येकाच्या खिशामध्ये आहेच, ते ही एका महिन्याचे बिनव्याजी (आपल्या वाटते पण खरे नाही) ३० दिवसांचे कर्ज देतं. मोठ्या शहरांतील घराच्या किंमती व मिळणारा पगार यात एवढी तफावत असते की, गृह कर्ज घेतल्याशिवाय गृहप्रवेश अशक्य होत चालला आहे. आजारपणाच्या औषध-उपचारासाठी अनेक लोक कर्ज घेत असतात. मोठमोठ्या टूर कंपन्या आपल्या विदेशवारीचे स्वप्न 'इएमआय' च्या माध्यमातून पूर्ण करत असल्यामुळे देखील अशा प्रकारचे कर्ज घेणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मॉलमध्ये अनेक कंपन्यांची माणसे, आपण घेणारी वस्तू ईएमआय वर घेण्यास आपल्याला भाग पाडतात, आपणही एकदाच पैसे द्यायची कटकट नाही म्हणून घेतो आणि नवीन कर्ज अंगावर घेत असतो!

भारतातील/जगातील कर्ज उद्योग/लोन इंडस्ट्री/व्यवसाय याच कारणास्तव भरभराटीला आलेला आहे. सरकारी व खाजगी बँकेच्या व्यतिरिक्त अनेक अशा वित्तीय संस्था आहेत ज्या लोकांना अल्पकालीन कर्ज मोठ्या व्याजदरावर देत आहेत आणि लोकही मोठ्या चवीने, सहज उपलब्ध होत आहे म्हणून कर्ज घेत आहेत. अनेक कंपन्यांनी तर त्यांचे मोबाइल ॲप बनविले आहेत, ज्या माध्यमातून (इन्स्टंट) ताबोडतोब कर्ज

उपलब्ध होत आहे. एवढेच काय तर, या कंपन्या अनेकदा स्वतःहून आपल्याला कर्ज घेण्याची विनंती करतात. थोडक्यात काय तर, कर्ज देणाऱ्या कंपन्या मोठा व्याजदर आकारून भरमसाठ नफा कमवत आहे आणि दुसरीकडे कर्जदार अनेक कर्जांच्या ओझ्याखाली जीवन जगत आहे. हा झाला कर्ज घेण्यापर्यंतचा प्रवास.

यानंतर सुरू होतो, घेतलेले कर्ज हप्त्याने (यास हप्ता का म्हणतात माहीत नाही, खरं तर मासिक म्हटले पाहिजे, असो.) परत फेड करण्याचा प्रवास. नियमाप्रमाणे आपल्या मासिक उत्पन्नाच्या ४० ते ५०% पेक्षा जास्त आपला ईएमआय असू नये किंवा तो ४०-५०% होईल एवढेच कर्ज आपल्याला मिळू शकते. पण हा नियम बँक, एनबीएफसी पाळतातच असे नाही. कर्जामध्ये सेक्युअर आणि अनसेक्युअर असे दोन मुख्य प्रकार आहेत. (सुरक्षित आणि असुरक्षित)

अर्जदाराची कोणतीही मालमत्ता गहाण ठेवून दिले जाणारे कर्ज म्हणजे सुरक्षित कर्ज. यामध्ये कर्ज फेडेपर्यंत गहाण ठेवलेली मालमत्ता बँकांकडे असते. जमीन, घर, सोने, मोटार यांसारख्या मालमत्तेचा समावेश असतो तसेच इक्विटी शेअर, मुदत ठेवी, म्युच्युअल फंड, लाईफ इन्श्युरन्स देखील गहाण ठेवून कर्ज घेतले जाते. यास सुरक्षित कर्ज, कर्जदारासाठी नाही तर बँकेसाठी म्हटले जाते. कारण कर्जदाराने कर्जाचे हफ्ते नाही फेडले तर बँक गहाण ठेवलेली मालमत्ता, कायद्याच्या प्रक्रियेप्रमाणे विकून स्वतःचे पैसे वसूल करते. विशेष म्हणजे दिलेले कर्ज आणि विकून प्राप्त झालेली रक्कम यात तफावत असेल तर बँक कर्जदाराकडून ती रक्कम वसूल करू शकते. काहीही तारण किंवा गहाण न ठेवता दिले जाणारे कर्ज हे असुरक्षित वर्गात मोडते. यामध्ये कर्जासाठी ग्राहकाकडून कोणत्याही प्रकारची हमी घेतली जात नाही. असे कर्ज उत्त्पन्न व उत्पनाचे स्रोत याचा इतिहास बघून दिले जाते. या कर्जास असुरक्षित कर्ज म्हटले जाते कारण कर्जदाराने जर कर्ज फेडले नाही तर दिलेले कर्ज वसूल करणे हे सुरक्षित कर्जासारखे सोपे जात नाही. सर्वेक्षण असे सांगते की ७५% भारतीयांकडे एमरजेंसी फंड नसतो, त्यामुळे जेव्हाकेव्हा अशी परिस्थिती उभारते तेव्हा ते असुरक्षित कर्ज घेतात व तात्पुरती गरज भागवून कायम स्वरूपाचे ओझे वाहतात.

भारतामध्ये कर्ज न फेडल्यामुळे होणाऱ्या आत्महत्या आपल्या सर्वांनाच माहीत आहेत. इंडियन एक्सप्रेसची बातमी सांगते की, एकूण आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ८०% शेतकरी कर्जाच्या ओझ्यामुळे, परतफेड न करता आल्यामुळे आणि कर्जाच्या हप्त्याच्या सततच्या मागणीमुळे आत्महत्या करतात. मघाशी म्हणल्याप्रमाणे सुरक्षित कर्ज सहजतेने वसूल केले जाते, पण असुरक्षित कर्ज वसूल करण्यासाठी बँका व इतर एनबीएफसी जे मार्ग वापरतात त्यामुळेही होणाऱ्या आत्महत्यांची संख्या वाढत चाललेली आहे. या आत्महत्या मागची कारणे दोन प्रकारची आहेत. एक म्हणजे स्वतःच्याच कर्जाच्या जाळ्यात अडकून, बाहेर निघण्याचा मार्गच बंद झाल्याचा समज होऊन व दुसरा म्हणजे बँका, एनबीएफसी व त्यांच्या वसुली विभागाच्या मानसिक त्रासामुळे व त्यांच्या माध्यमातून झालेल्या बदनामीतून. आरबीआय, बँका व एनबीएफसी संस्थेचा पालक म्हणून कमी पडत आहे यात काहीच अ-तथ्य नाही. असुरक्षित कर्जाची वसुली कशी करायची याबद्दलचे अनेक नियम, सूचना, आदेश आरबीआयने बनवले असले तरी त्याला अनेक कर्ज देणाऱ्या कंपन्या जुमानत नाही. गुगलच्या विश्वात आपल्याला अशा आत्महत्येंच्या अनेक कहाण्या वाचायला मिळतील. असुरक्षित कर्जाचा एक हप्ता चुकला की वसुली बाज, रिकव्हरी एजन्सी दिवसाला १०-१५ कॉल करतात. त्यांचे बोलणे एवढे अपमानास्पद व कर्जदाराला स्वतःच्या नजरेत उतरविणारे असते की, आपसुकच स्वतःचे बरे-वाईट करण्याचा विचार सुरू होतो. फोनच्या माध्यमातून

रिकव्हरी न झाल्यास कर्जदाराच्या घरी जाणे, शेजाऱ्या-पाजाऱ्या समोर अपमानास्पद बोलणे असे प्रकार सुरू होतात. ज्या ठिकाणी कर्जदार कामावर आहे त्या ठिकाणी जाणे सुरु होते. नातेवाईकांना कॉल करणे सुरु होते. कर्ज वसुलीच्या या घटना सर्रासपणे आपल्या अवती-भोवती घडत असतात. या घटनातुन अनेक कुंटुब रस्त्यावर आलेली आहे, उध्वस्त झालेली आहे. परंतु दुर्दैवाने आरबीआय सुचना व आदेश काढण्या पलीकडे विशेष असे काही करतांना आढळत नाही. ग्राहक संरक्षण आयोगाने अनेक प्रकरणामध्ये अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या संस्थेस धारेवर धरलेले आहे. रिकव्हरी एजन्सी संबंधित सर्व नियम पुढच्या लेखात सविस्तर पणे मांडेल. त्या आगोदर या लेखाचा उद्देश सांगणे आवश्यक वाटत आहे. पहिला म्हणजे कर्ज घेणे टाळले पाहीजे किमान आवश्यक नसलेले. शो ऑफ करण्यासाठी असलेल्या वस्तुवर कधीच कर्ज घेऊ नये. जसे की महागड्या गाड्या, महागडे मोबाईल इ. दुसरे असे की आपल्या पगाराचा व उत्पन्नाचा किमान २० ते २५% भाग बचत म्हणुन ठेवलाच पाहीजे, जेणे करुण अडी-अडचणीच्या वेळेस असुरक्षित कर्ज घेऊन कुणाच्या तरी जाळ्यात अडकण्याची गरज पडणार नाही. आणि तिसरे सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे काहीही झाले तरी कर्ज फेडता येत नाही किंवा रिकव्हरी एंजन्सीवाले खुप मानसिक त्रास देतात म्हणुन कधी ही आत्महत्येचा विचार मनाला व शरीराला शिवु देऊ नये. पैसे असतील तर नक्कीच कर्ज फोडून मोकळे व्हावे पण पैसे नसतील तर स्वतःला संपविण्याचा मूर्खपणाचा विचार कधीही करू नये. बाकी सविस्तर पुन्हा कधी तरी.

**- विनोद एच. वाघ**
सहाय्यक प्राध्यापक
विद्या प्रसारक मंडळाचे
टीएमसी विधी महाविद्यालय, ठाणे

•••

(मुखपृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

भरविले आहे. काही वस्तू बंद इमारतीत तर काही वस्तू उघड्यावर ठेवलेल्या आहेत. भारताच्या वेगवेगळ्या राज्याची तिथे दालने असून त्या त्या राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण वस्तू आणि चित्रे यांचे या दालनात प्रदर्शन भरविले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्र दालनाचे देता येईल. या दालनाच्या भिंतींवर सगळ्या बाजूला वारली पेंटिंग काढून ठेवण्यात आली आहे.

शांती निकेतन जवळ असलेले दुसरे ठिकाण म्हणजे सुनाझुरी हाट. दर शनिवारी आणि रविवारी इथे एक बाजार भरतो. या परिसरात राहणाऱ्या आदिवासी मंडळी त्यांनी बनविलेल्या वस्तू विक्रीसाठी आणतात. अलीकडे या वस्तूंचा व्यवसाय करणारे काही व्यापारी तयार झाले आहेत. हे व्यापारी आदिवासी लोकांकडून वस्तू विकत घेतात आणि बाजारात विकतात. यातून त्यांना पुरेसा नफा मिळतो. बाजारासाठी वेगळी अशी राखीव जागा नाही. सुनाझुरीच्या जंगलात झाडांच्या सावलीत ही दुकाने थाटलेली असतात. खाली जमिनीवर सतरंजी अंथरून त्यावर विक्रीसाठी वस्तू ठेवलेल्या असतात. यात समावेश असतो तो कापड, खेळण्या, शोभेच्या वस्तू यांचा. बाजाराचे दृश्य मनाला मोहून टाकते. तिथे विक्रीसाठी ठेवलेल्या रंगीबेरंगी वस्तू मनाला आकर्षित करीत असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती काहीना काही खरेदी करूनच बाजाराच्या बाहेर पडतो. मी फारशी खरेदी केली नाही. परंतु खूप ज्ञान गोळा करून मी शांती निकेतनचा निरोप घेतला.

**- डॉ. सुधाकर आगरकर**

•••



# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**पुष्कर –**

प्रत्येक वर्षी कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेला पुष्करच्या लहान शहरात उंट व इतर पशुंचा खूप मोठ्ठा मेळा किंवा जत्रा तलावाच्या भोवताली भरते. पौर्णिमेचा शुभ चंद्र हजारो हिंदू यात्रेकरूंना आकर्षित करतो. ते पवित्र पाण्यात आंधोळ करण्यासाठी व मोक्ष मिळवण्यासाठी पौर्णिमेला येतात. हा मेळा रायकांसाठी वर्षांतील सर्वोच्च क्षण असतो. इथे ते उंटांचे तरुण नर विकतात व संपूर्ण वर्षांचा नफा एकदम मिळवतात. जर मेळा मोठा नसला व खूप विकत घेणारे नसले तर उंटांना परत घरी आणावे लागते व फायदा होण्यासाठी दुसऱ्या वर्षांपर्यंत वाट बघावी लागते. पण मेळा जोरात असला व मागणी जास्त असली तर रायका पैसे व आपल्या कुटुंबासाठी भेटवस्तू घेऊन घरी जातात. इल्सला 'पुष्कर' मेळाव्यासाठी परत भारतात येता यावे म्हणून शिष्यवृत्तीचे अनुदान एक महिन्याने वाढवण्यासाठी भांडावे लागले. कारण उंटपालकांच्या वार्षिक चक्रांतील अत्यंत परिणामकारक पुष्कर मेळावा बघितल्याशिवाय तिचे उंटांवरचे संशोधन पुरे झाले नसते.

तिच्या महिन्याभराच्या मुक्कामात दोन गोष्टी साध्य करायच्या होत्या. एक म्हणजे तिने डॉ. देवारामशी सविस्तरपणे चर्चा करून व त्याच्या सांगण्याप्रमाणे एका संस्थेची स्थापना करायची होती, जिचे महत्त्वाचे उद्दिष्ट रायकांच्या फायद्यासाठी व त्यांच्या उन्नत्ती व प्रगतीसाठी असेल. अशी संस्था जी चरण्याच्या हक्काचा पाठपुरावा करेल व रायकांची कशी पिळवणूक होते आहे या विषयी जागरुकता वाढवेल, तसेच शैक्षणिक उपक्रम व इतर चांगले काम करेल. कुठल्याही प्रकारचे फंड किंवा आर्थिक मदत मिळविण्यासाठी रायकांनी बनलेली संस्था असणे गरजेचे होते.

दुसरी गोष्ट म्हणजे, तिला अगदी सुरवातीपासून प्रश्न पडला होता की, रायका त्याच्या उंटाच्या संभाव्य उत्पादनाचा इतका मर्यादित उपयोग का करतात? अन्न उत्पादनासाठी त्यांच्या क्षमतेचा फार कमी वापर केला गेला होता. त्यांचे या प्राण्याबरोबर बदाऊनी किंवा सोमाली याच्यापेक्षा वेगळे संबंध आहेत का ?

या प्रश्नाकडे बघण्याचा दुसरा मार्ग ऐतिहासिक दृष्टीकोनातून होता. इथे आर्थिक, राजकीय व पर्यावरणाच्या कुठल्यावेळी उंटांनी राजस्थानांत प्रवेश केला, या प्रश्नावर फारशी माहिती उपलब्ध नव्हती. ऐतिहासिक दृष्टीकोनाखेरीज व दुसरा आंतरसांस्कृतिक दृष्टीकोन होता. तिने असे ऐकले होते की, सिंधी मुस्लीमही उंटांचे प्रजनन करीत असत, मोठ्या प्रमाणांत उंट ठेवीत असत. त्याच्यातही असे रायकांसारखे निर्बंध होते का? की ते इतर देशांतील मुस्लिमांप्रमाणे उंटाचे मांस आवडीने खात?

तसेच, ते उंटाच्या दुधापासून दही व तूप करणे टाळून फक्त ताजे दूध वापरण्यावरच भर देतात का? की, उंटाच्या दुधावर प्रक्रिया करणे अ-व्यवहार्य होते?

हणमंत, ज्याची टॅक्सी तिने पत्राने आरक्षित केली होती, तो जोधपूरच्या विमानतळावर तिची वाट पाहत

होता. त्याने तिला नेहमीचा गोंधळ व गोंगाट, व भाडे शोधत असलेल्या टॅक्सी ड्रायव्हर्सच्या गर्दीतून बाहेर काढले व तिला पटकन त्याच्या ॲबेसिडरच्या आश्रयस्थानी नेले. तिने रेल्वे स्थानकाजवळच्या एका छोट्या हॉटेलमध्ये डॉक्टर देवराम यांना भेटण्याची व्यवस्था केली होती, पण त्याचा कुठेच पत्ता नव्हता. हणमंतने तिच्या सर्व सुखसोई नीट आहेत की नाही हे पाहून घेतले व तिला आराम करायला सांगितला व तो डॉ. देवारामचा शोध घेण्यास गेला.

'तू विश्रांती घे' हे वाक्य तिने इतके वेळा ऐकले होते की, तिला त्याचा तीव्र तिरस्कार वाटू लागला होता. तिला खरोखर विश्रांतीची गरज आहे की नाही हे लोकांना कधीच समजले नाही की, ही त्याचे काम करायला जाण्यासाठी एक सोईस्कर सबब होती? देवराम जोधपूरमध्ये कुठेही नव्हता. 'कदाचित तो उद्या येईल, काळजी करू नकोस. मी तुझ्यासाठी बिस्किटे आणि केळी आणली', त्याने तिला धीर दिला.

तिने तिची संध्याकाळ कोंदट व खिडकी नसलेल्या खोलीत राजस्थानमधून प्रवास करण्याचा कार्यक्रम आखण्यात घालवली. दुसऱ्या दिवशी सकाळी ती बेड टी घेत असतांनाच फोनची बेल वाजली व स्वागतकक्षातील माणसाने तिला सांगितले की, तिला भेटायला कोणीतरी आले होते. तो देवाराम होता व त्याच्याबरोबर आणखी एक रायका आला होता. तो पिवळी पगडी घातलेला उत्साही मध्यम वयस्क मनुष्य होता. हणमंतने ओळख करून दिली. तो भोपालाराम रायका, खारा बेराहून आला होता. तो प्रसिद्ध रायका नेता होता व पशु-संवर्धन करणाऱ्या संस्थेचा, पशुपालक संघटनेचा अध्यक्ष होता. तिने त्याच्या नावाविषयी अनेक वेळा ऐकले होते. जरी त्याला औपचारिक (अधिकृत) राजकीय काम नव्हते, तरी राजस्थानची राजधानी जयपूरच्या सत्तेच्या वर्तुळांत, घरच्या सारखं वावरत होता. भोपालाराम त्याच्या जातीसाठी व पशुपालक समाजासाठी दबाव आणत होता. तो राजस्थानचे मुख्यमंत्री भैरवसिंग शेखावत यांचा जवळचा माणूस होता. जरी तो निरक्षर होता तरी तो नेहमी मोठी फाईल बाळगत होता व त्यांतून वेगवेगळ्या सरकारांशी संस्थाशी केलेल्या पत्र-व्यवहाराचे कागद बाहेर काढत असे. मुख्यतः पशु-संवर्धन विभागाशी.

डॉ. देवारामने सांगितले की, त्याने रायकांसाठी पालीला १० वाजता एक सभा ठेवलेली होती, म्हणून त्याने भोपालारामला बरोबर आणलेले होते. ते पराठे व दह्याचा झटपट नास्ता करतात व पालीला प्रयाण करतात. वाटेत ते सोसायटीला द्यायच्या नावाची चर्चा करतात व नांव ठरवतात. 'रायका जागृती आणि स्थानिक ज्ञान प्रशंसा समाज.' ती भोपालारामला रायकांच्या मुळा विषयी विचारते.

पालीला रायकां समाजाच्या वसतिगृहात सभा बोलावली होती, १० वाजून गेले होते तरी कोणाचा पत्ता नव्हता. डॉ. देवारामने एक लाऊडस्पीकरची व्यवस्था, तसेच चहा आणि जेवण आणि जास्तीची बिस्किटे व केळ्यांचीही व्यवस्था केली होती. हळूहळू नंतरच्या काही तासांनी रायका जमू लागले व चाळीस एक रायका जमले. साधारण दुपारी दोन वाजता, डॉ. देवारामने याच्या लांबलचक भाषणाने सभेला सुरवात झाली.

तिच्या छोट्याशा भाषणात तिने सांगितले की, रायकांना त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा अभिमान असायला हवा व जगाच्या इतर भागांमध्ये समान समस्या असलेल्या रायकां सारखे लोक आहेत. नंतर उपस्थित असलेल्या प्रत्येकाने थोडेसे भाषण केल्यावर देणग्या जमा होऊ लागल्या. लोकांनी त्यांचे पैसे काढून देवराम आणि तिला दिले. याबद्दल ती आनंदी नव्हती, कारण यामुळे निश्चितपणे त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. एक औपचारिक

संस्था निर्माण करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नव्हते. याचा अर्थ असा होता की, देवरामवर अधिक पैशांचा बोजा पडला होता, तर तो कसा खर्च करायचा हे ठरवणारे अधिकारी किंवा मंडळ नव्हते, किंवा समाजाच्या उद्दिष्टांची निवेदन पत्रिकाही नव्हती पण ती समस्या नंतर सोडवता आली असती. तिला असे वाटले की, आता त्यांची मोठ्या भारतीय वाळवंट, थरच्या वाळवंटाचा दौऱ्यावर जाण्याची वेळ झाली होती.

त्यांचा चमू किंवा पथक, देवराम (डॉक्टरसाब) आणि ती (मॅडम) व हणमंत (ड्रायवर साब) विश्वसनीय ॲबेसिडरमध्ये पालीहून पश्चिमेकडे सरळ रेषेत निघाले. थरचे वाळवंट हे जगांत सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले वाळवंट म्हणून ओळखले जाते. जरी पांढरी वाळू त्याला वाळवंटाचे स्वरूप देते, तरीही सरासरी वार्षिक पावसाचे प्रमाण तुलनेत, अरबी वाळवंटापेक्षा खूप जास्त आहे. थरचे सर्वांत प्रमुख नैसर्गिक वैशिष्ट्य म्हणजे त्याची विस्तृत वृक्ष वनस्पती संपदा जी उंटांचा उत्कृष्ट चारा देते. खेजरी हा सर्वांत प्रसिद्ध वृक्ष आहे, बाभळीचा एक खुरटलेला प्रकार ज्याच्या पानांमध्ये प्रथिने जास्त असतात आणि ज्याच्या शेंगांची भाजी राजस्थानच्या पाककृतींपैकी एक आहे.

थरचे वाळवंट विस्तीर्ण आहे आणि दहाव्या शतकापासून भारतावर पश्चिमेकडून नियमितपणे आक्रमण करणाऱ्या मुस्लीम सैन्यांना त्याची संपत्ती लुटण्यासाठी ते ओलांडून जावे लागले. त्यांच्यापैकी पहिला आक्रमक अफगाणिस्तानातील गझनीचा महमूद होता, ज्याने भारतावर एकूण सतरा स्वाऱ्या केल्या. इ.स. ९७९ आणि १०२५ च्या दरम्यान आणि सोमनाथ येथील हिंदू मंदिरांची तोडफोड करून, त्यातील शुद्ध सोन्यापासून केलेल्या मूर्ती लुटल्या. आक्रमणाच्या दरम्यान त्याला पाणी वाहून नेण्यासाठी उंटांची गरज होती. मुलतानमधील ट्रेकची तयारी करताना, त्याने आपल्या ३०,००० सैनिकांपैकी प्रत्येकाला पाणी वाहून नेण्यासाठी दोन उंटांसह सुसज्ज केले आणि त्याव्यतिरिक्त, आणखी २०,००० उंट तयार केले. उंटांची इतकी डोकी मिळविण्यासाठी, व्यापक उंट-प्रजननाची मोहीम ही एक गरज होती. ती त्या वेळी अफगाणिस्तानमध्ये अस्तित्वात होती, पण भारताचे काय ? हेच ते जाणून घेण्याचा प्रयत्न करत होते.

बारमेरजवळील किराडू नावाच्या ठिकाणी असलेल्या शिवमंदिरांचा एक छोटासा समूह तपासण्यासाठी त्यांचा पहिला पुरावा होता. ते मैथुन आणि भार वाहून नेण्यात कोरीव उंटांच्या झुंजींनी सुशोभित होते. बाराव्या शतकातील. यावरून याला समर्थन मिळते की, या काळात भारतीय वाळवंटातून कॅराव्हान व्यापारासाठी एक-कुबड उंट वापरले जात होते. हे अर्थातच काही नवीन नव्हते, मुस्लीम आक्रमणांचा विचार करता आक्रमणकर्ते किंवा व्यापाऱ्यांनी पश्चिमेकडून आणलेले उंट आणि उंटाच्या उत्पादनाचा प्रत्यक्ष सुरवात. यात मोठा फरक होता. उंटांचे उत्पादन ही प्रजननाची सुरुवात होती ज्यामध्ये तिला स्वारस्य होते.

तिचा सिंधी मुस्लिमांना भेटण्याचा विचार होता, पण ते कुठे स्थायिक झाले होते, या संबंधी तिला कल्पना नव्हती. अरे ते वाळवंटात जैसलमेरजवळ राहतात, तिथे जा आणि तुला बरेच सापडतील, ती त्याना भेटू शकेल का या प्रश्नाचे हे नेहमीच उत्तर होते. पण वाळवंट मोठे होते. पण असे असले व अचूक दिशानिर्देशांचा अभाव असला, तरी तिच्या लहान चमूसाठी कोणताही अडथळा नव्हता, त्यांच्यासाठी ते छोटेसे आवाहन, साहस होते. ती जैसलमेरला ड्रायव्हरसाहेब आणि डॉक्टरसाहेब यांच्याबरोबर अनिश्चित मार्गाने निघाले.

हे एक वाळवंट असले तरी आणि लोकसंख्येचे प्रमाण फार कमी असले तरी, उंटाचा वापर कसा केला

जातो, त्यापासून उत्पन्न कसे मिळवतात आणि थरच्या लोकांसाठी उंट कसे अपरिहार्य होते याची झलक मिळवता आली. येथील परिस्थिती गदवाला मधील परिस्थितीपेक्षा भिन्न होती. तेथे फक्त रायकाचें अस्तित्व उंटावर अवलंबून होते. इथे समाजातील प्रत्येकजण खालच्या किंवा उच्च जातीतील उंटावर अवलंबून होता. उंटांची पैदास करणाऱ्या रायकांकडे मादी उंटांचे कळप होते. इथे लोकांकडे एक नर उंट असतो. ज्यांचा ते कामासाठी उपयोग करतात व उदरनिर्वाहासाठीही वापरतात. याची सुरवात छोट्या चारचाकी उंटांनी ओढलेल्या गाड्यांच्या तांड्यापासून झाली. तो भिल्लांचा होता व ते अनुसुचित जाती पैकी होते व पैसे मिळवण्यासाठी गुजरातमधील मेहसाणा येथे उंटाच्या गाड्यांनी जात होते.

ते प्रजनन करणारे नव्हते आणि त्यांनी त्यांचे उंट इतर जातीकडून विकत घेतले होते व ते कोणत्याही सिंधी मुस्लिमांना ओळखत नव्हते.

एक बिनधास्त, पगडी घातलेला तरुण ज्या महामार्गावरून ते जात होते त्याच दिशेने चालत होता त्याने सांगितले की, 'तो कोणत्याही सिंधी मुस्लिमांना ओळखत नाही, परंतु भरपूर उंट असलेले गाव तो दाखवू शकतो. कृपया आमच्याबरोबर या आणि आम्हाला त्या गावाचा रस्ता दाखवा'. हणमंतने आधीच दार उघडले आणि त्याला आत येण्याचा इशारा केला. 'ठीक आहे', तो म्हणाला, आणि त्याने मनापासून मान्य केले आणि त्यांना सपाट वाळूच्या ढिगाऱ्याच्या मागे लपलेले इनद्रोइ गाव दाखवले. त्यांनी पहिले दृश्य पाहिले की, दिवसभरासाठी लागणारे पाणी मातीच्या व धातूच्या भांड्यात भरण्यासाठी महिलांच्या गर्दीने वेढलेली विहीर. या विहिरीवर उंट पुढे-मागे लयबद्धपणे चालत होता, वर खेचण्यासाठी, ओतण्यासाठी आणि पाण्याने भरलेला एक मोठा काळ्या रबराचे भांडे भरण्यासाठी. जेव्हा ते थांबले आणि कारमधून बाहेर पडले तेव्हा त्या समाजातील अर्धे पुरुष घरातून सशस्त्र बाहेर आले, तर महिला विखुरल्या. एकमेकांचा झटपट परिचय करून घेतल्यावर समजले की, हे राजपुतांचे गाव आहे जे हणवंतच्याच वंशाचे होते. त्यांना मिळालेली वागणूक कोणत्याही मुघल सम्राटाला अभिमान वाटावी अशी होती. खासकरून पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी बनवलेल्या आनंददायी कोल झूपामध्ये त्यांना चारपाईवर ताणून आराम करण्याचा आग्रह करण्यात आला. त्यांच्या डोक्याखाली भरतकाम केलेल्या उशा ठेवल्या गेल्या, त्यांनी पाणी, चहा आणि बिस्किटे दिली गेली आणि नंतर त्यांचे मनोरंजन करण्यासाठी आणखी थांबे वाढवले गेले. सर्व प्रथम, इल्सच्या करमणुकीसाठी आणि फोटो-संधीसाठी आणलेला एक घोडा अतिशय सुंदरपणे, लगाम आणि खोगीरीने सजलेला होता. स्थानिक संगीताचा आस्वाद घेण्याने त्यांच्या मुक्कामात आणखी गोडी वाढली. वाटेत त्यांना यजमानांनी सांगितले की, 'इथे काही सिंधी मुस्लीम आहेत पण ते उंटांचे प्रजनन करत नाहीत. पण ते चांगले संगीतकार आहेत. मॅडमला थोडे संगीत ऐकायला आवडेल का ?' असे विचारून एका झाडाखाली एक गालीचा पसरला व अनेक रंगांच्या फेट्यातील तीन सिंधी खाली बसले त्यांनी आपली वाद्ये लावली व एक उत्कृष्ट मैफल जमवली.

ते जरी उंट पालक व त्यांचे प्रजनन करणारे नव्हते तरी त्यांनी पुढे जाऊन त्यांना माणूस व उंट यांतील संबंध उलगडून दाखवला.

मुमल व महेन्द्र हे राजस्थानमधील प्रेमकाव्य आहे, त्यांत उंट हा महत्त्वाचा भाग आहे. मुमल ही लेडोर्वाची राजकन्या होती. तिचे उमरकोटचा राजपुत्र महेन्द्र याच्यावर प्रेम होते. त्यांनी लग्न केले नव्हते, पण एकही रात्र ते एकमेकांपासून वेगळे राहू शकत नव्हते. चिकल नावाच्या वेगवान उंटामुळे महेन्द्र रोज २०० कि.मी. अंतर जात असे व उमरकोटला परत सकाळी येत असे. एकदा

मुमलची बहीण तिला शयनगृहात प्रवेश मिळावा म्हणून व अनाकलनीय (रहस्यमय) राजपुत्र नजरेस पडावा म्हणून संगीतकाराचा वेष करून भेटायला आली. महेन्द्रला यायला उशीर झाला. दोघी बहिणी झोपी गेल्या. नंतर महेन्द्रने आल्यावर पाहिले की, मुमल एका पुरुषाबरोबर झोपली आहे. तेव्हा तो त्याला विश्वासघात वाटला व त्याला हृदयविकाराचा झटका आला व तो मरण पावला. जेव्हां मुमलला हे कळले तेव्हा तिचाही प्रेमभंगाने मृत्यू झाला.

हृदयविदारक आवाज ऐकून राजस्थानातील सर्व स्त्रियांविषयी ती सहानुभूतीने भारावते, जास्त करून राजपूत स्त्रियांविषयी ज्या जवळ जवळ घरांतच कोंडलेल्या असत आणि त्यांना त्यांच्या नवऱ्याचा लांब दुरावा सहन करावा लागे. ते मुंबई किंवा इतर दूर शहरी गेले की त्यांना ते कधी परत येतील हे कळत नसे. त्यांचा पुष्कळसा वेळ वाट बघण्यातच जात असे.

तिला वाटले की, मोठ्या प्रमाणांत अतृप्त राहिलेलं प्रेम जास्त दृढ असते व एकमेकांचा सहवास अधिक गोड असतो.

जणुकाही तिचे विचार त्यांच्या यजमानाने ओळखले व तिला सर्व स्त्रियांना भेटायला बोलावले, ज्या एका उंच  भिंती असलेल्या बंदिस्त झोपडीत वाट बघत होत्या. त्यांचे सौंदर्य काळोख्या झोपडींतही चमकून गेले. लाजत त्यांनी आपले घुंगट बाजूला केले व तिचे अनाकर्षक कपडे न्याहाळले. तिच्या मुलांबद्दल, तिचा नवरा कुठे आहे? व तिच्या बरोबर आलेल्या पुरुषांचे तिच्याशी काय नाते आहे ? याबद्दल त्यांनी प्रश्न विचारले. अपराधीपणाने तिला जाणवले की, त्यांनासुद्धा प्रवास करायला व  इतर ठिकाणे बघायला आवडतील. व तिने परत दुसऱ्या भेटीसाठी यावे असे त्यांनी तिला सांगितले.

त्यांची मोहीम सुरूच राहिली आणि दुपारच्या सुमारास जवळपास तीस घरांनी बनलेल्या रायका धानीजवळ पोहोचले. देवरामने एका वडील रायकाशी संभाषण केले, ज्याने लगेच आत बोलावले. संभाषणांत त्याने सांगितले की, ही राजस्थानमधील सर्वांत पश्चिमेकडील रायका वस्ती आहे. पूर्वी बहुतेक कुटुंबांकडे प्रजननासाठी अर्धा डझन किंवा त्याहून अधिक मादी उंट होत्या, परंतु शेळ्या हा पशुधनाचा सर्वांत महत्त्वाचा प्रकार होता. दुष्काळ वारंवार पडत असे - दर तीन किंवा चार वर्षांनी लोकांना त्यांच्या कळपांसाठी चरण्याच्या शोधात दक्षिणेकडे गुजरातमध्ये स्थलांतर करावे लागले. कायर इतकी दाट होती की, त्यातून जाता येत नसे, आता ती क्वचितच दिसते. (एकप्रकारची थर वाळवंटातील वनस्पती) त्याने शोक व्यक्त केला. देवरामने हळूवारपणे संभाषण उंटाच्या दुधाकडे केले आणि त्यावर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया केली जाते का? उंटाच्या दुधापासून दही बनवता येईल का? त्यांच्या यजमानांच्या नजरेतून हे स्पष्ट होते की, तो त्यांना पराक्रमी अशिक्षित मानत होता.

त्याने उंटाच्या दुधाचे दही करत नाहीत याबद्दल आणखी एक दंतकथा सांगितली. डॉ. देवारामला ती फारशी पटली नाही. त्याच्यामते, पाबुजीने सांगितले होते की, उंटाचे कच्चे दूध अतिशय मौल्यवान आहे ,ते अनेक रोग बरे करू शकते. म्हणून त्याच्यावर प्रक्रिया करणे योग्य नाही. म्हणून ते बदलू नये.

संध्याकाळपर्यंत ते जैसलमेरला पोहोचले. ते एकेकाळी हे वाळवंटाच्या मधोमध अलिप्त चौकी आणि व्यापारी केंद्र होते, पण आता पर्यटकांची गर्दी होती. जैसलमेरमध्ये एक वैभवशाली किल्ला आहे जो पिवळसर वाळूच्या खडकांपासून बनवला गेला आहे आणि त्याच्याभोवती छोट्या, छोट्या चक्रव्यूहाप्रमाणे गल्ल्या आहेत, सर्व ठिकाणी असणाऱ्या सफारीच्या बॅनर्सच्या जाहिरातींचा त्यांनी पुढील काही दिवसांमध्ये त्यांच्या

शोधांचा आधार म्हणून त्याचा वापर केला.

खूप जास्त शोध घेऊनही, सिंधी मुस्लिमांची माहिती देणारा इथेही सापडला नाही.

बिकानेरप्रमाणेच उंट प्रजननाच्या विविध पद्धतींनुसार मारुडी राठोड गावात, राजपूत मोठ्या प्रमाणावर उंटांचे प्रजनन करीत होते.

अचला रायका धानीत एक हजार उंट होते १९४७ पर्यंत, अचला लोकांनी जैसलमेरचे महाराज, जैसा जवाहर सिंग यांच्या ४,००० उंटांची देखरेख केली होती. त्यांच्या पूर्वजांनी रायकाना जोधपूरहून या हेतूने आणले होते. आत्ताही महाराजांनी काही उंट ठेवले होते त्यासाठी ते रायकांना नियमितपणे काही पैसे देत असत.

या संबंधामुळे त्यांचे उंट अजूनही भट्टी राजपूत या ब्रॅडमार्कने सुशोभित होत होते. घंटा-आकाराच्या चिन्हाचे ब्रॅंड मार्क त्यांच्या दोन्ही बाजूला (कुशीत) होते. येथे देखील, उंट पूर्ण वर्षभर मोकळे वावरत. पण ते तेथील स्थानिक विहिरीशी जोडलेले होते व तेथे परत, परत येत.

मोहनगडमध्ये, जे धुळीने भरलेले गाव होते तेथे त्यांनी थोडी प्रगती केली. ते इंदिरा गांधी कालव्यापासून सुमारे ४ किमी दूर होते. हा कालवा पंजाबमधून वाळवंट हरित करण्यासाठी पाणी आणतो. त्याने पर्यावरणांत खूप बदल घडवून आणला. काहीजण म्हणतात, 'या कालव्याने पर्यावरणाचे नुकसान केले आहे.' काही ठिकाणी पाणी साचत होते आणि त्यामुळे मलेरिया सगळीकडे पसरला. जमीन जी पूर्वी सर्वांची मालमत्ता होती व चराईसाठी उपलब्ध होती, तिचे धंद्यासाठी, पंजाबातून आलेल्यांनी व्यवसायासाठी खाजगीकरण केले होते.

जुन्या किल्ल्याच्या अवशेषाजवळ बसून, चहा घेता, घेता ते दोन सिंधी मुस्लीम व एका राजपूत जे दोघेही उंटांचे प्रजनन करत होते. त्यातील राजपूतांने उंटाच्या दुधापासून केलेल्या दह्याबद्दल महत्त्वाचा मुद्दा सांगितला. तुम्ही उंटाच्या दूधापासून दही बनवायचा प्रयत्न केलात तर काही वाईट घडणार नाही, पण त्याचे दही होणारच नाही. चौपन्न वर्षांपूर्वी जेव्हा मोठा दुष्काळ पडला, तेव्हां सगळ्या गाई मेल्या. तेव्हां त्यांनी उंटाच्या दुधापासून दही करायचा प्रयत्न केला, पण दही बनले नाही.

कमलखान हा सिंधी मुस्लीम भाला या गावातला होता. ते गाव ४५ कि.मी. उत्तरेकडे, पाकिस्तानच्या सीमेला अतिशय जवळ आहे, व ते कालव्याच्या भागात येणार होते. त्याने त्याच्या गावातील उंटांची खूप स्तुती केली. पण तो हेही म्हणाला की, परिस्थिती बदलेल. भल्लाचे उंट त्यांच्या सुंदर दिसण्यासाठी, त्यांच्या चालीसाठी व प्रामाणिक स्वभावासाठी प्रसिद्ध आहेत. त्याची किंमत १५००० पर्यंत असते. दोघांनीही सांगितले की, ते त्यांच्या उंटांना मोकळे भटकू देतात. 'ते कधी हरवत नाहीत का? ते कधी सीमारेषा पार करून जात नाहीत का?' असे विचारल्यावर कमल खानने सांगितले की, 'ते पाकिस्तानातील लोकांशी संपर्क साधतात व ते नेहमीच त्यांना परत पाठवतात.' त्यांच्या उंटांना ठरावीक विहिरींची सवय आहे. ते तिथे नियमितपणे येतात. जेव्हा मादी उंट विहिरीशी येतात तेव्हा ते त्यांचे दूध काढतात. त्याचवेळी ते तरुण उंटांना वश करण्याचा प्रयत्न करतात व वेगळे खास काहीतरी खायला देतात. ते लक्षात ठेवून नेहमी परत येतात.

इल्सने त्यांना विचारले, 'तुमच्याकडे आजाराची मोठी समस्या आहे का?' यावर त्याने उत्तर दिले 'काहीजणांना कफ, डायरिया, मॅनगे व रिंगवर्मचीही समस्या येते. पण टिबूरसा होत नाही. कारण हा भाग अतिशय कोरडा आहे व तेथे माशाही नाहीत. पण कालवा आल्यावर सर्व चित्रच बदलेल.' ते म्हणाले की, 'आमच्याकडे जास्तीत जास्त उंट विकू. कारण

आम्हांला जमीन मिळेल  व आम्हीं तीन, चार उंट फक्त कामासाठी ठेवून त्यांना वैरण देऊ.'

इल्सला वाटले मग उंटांची पैदास कोण करेल? कोणालाच उंटांचे प्रजनन करायचे नाही व त्यासाठी जमीनही नाही. ही एक मोठी समस्या आहे.

त्यांना परत जोधपूरला मागे जाणे गरजेचे होते कारण पुष्कर मेळ्याला सुरवात झाली होती. त्यांना फारसा वेळ नव्हता. पण ते मागे फिरून पाहुजी राजपुत हिरो, त्याचे मूळ जन्मस्थान कोलुमंड इथे जाण्याचा मोह आवरू शकले नाहीत. त्याने उंट राजस्थानमध्ये पुतणीला लग्नाची भेट म्हणून आणले होते.

हणमंत तेथे जाण्यासाठी उत्सुक होता. कारण पाबुजी त्याच्याप्रमाणे राठोडांच्या कुळातला होता म्हणून तो त्याचा लांबचा नातलग होता. तिला पाबुजी हा एखाद्या चमकदार चिलखतातील शूर सरदार वाटला, पण तिला त्याला ऐतिहासिक पुरुष म्हणून समजणे कठीण जात होते. रायका त्याला देव मानत होते.

पाबुजी जिथे जन्मला होता व जिथे त्याने ठाकूर म्हणून सत्ता गाजवली होती. त्या ठिकाणी गेल्यावर त्याने जे आयुष्य घालवले होते व ज्या मातीने त्याला घडवले होते त्या विषयी तिने कल्पना केली. तो एक सरंजामी, जहागीरदार होता. पण त्याची जहागिरी ओसाड होती. महाकाव्यांत तो अतिशय आदरणीय व विनोदी आहे. पण त्याने अतिशय टंचाई व काही वेळा पावसाळ्यात थोडासा काळ विपुलतेचा असे आयुष्य अनुभवले असणार. तेथे लाल  सॅन्डस्टोन मध्ये भक्तिमय स्टेला असलेले एक छोटे मंदिर होते. त्याच्या आजूबाजूला पवित्र व संरक्षित क्षेत्र होते. जिथे झाडे कापायला परवानगी नव्हती. ज्या विहिरीजवळ गाई चोरल्या गेल्या त्या विहिरींचे, अवशेष ज्याच्या सुरक्षततेसाठी त्याने प्राण दिले तेही बघायचे होते.

त्यांच्या पुढच्या प्रवासाच्या दरम्यान, जोधपूरच्या धावत्या भेटीत ती प्रो. झाहूरखान मेहर जातीने सिंधी मुस्लीम, व्यवसायाने इतिहासकार व व सर्व उंटांविषयीचे ज्ञान असणाऱ्यांचे सहकारी, यांची सुदैवाने भेट झाली.

त्यांनी सांगितले की, सिंधी मुस्लीमांचे तीन प्रकार आहेत. एक प्रकार, मेहेर आहेत. यांचे पूर्वज या देशात महंमदबीन कासीम बरोबर आले जेव्हा त्याने ७११ AD मध्ये सिंध काबीज केला. नंतर सियार मुस्लिमांचे दोन पंथ आहेत. ते मुळात हिंदू होते, पण नंतरच्या काळात त्यांनी धर्मांतर केले.


इतिहासकार म्हणून तुम्हांला राजस्थानात उंट पहिल्यांदा कधी आले ते माहीत आहे का? असे विचारल्यावर ते म्हणाले, हो नक्कीच. आम्हा मेहेराचा त्यांत सहभाग होता. पंधराव्या शतकांत सायरा भगानी नावाचा एक मेहेर होता. तो लांकिया नावाच्या गावांत राहत होता. जे उमरकोट पासून १२ कि. North West कडे आहे. उमरकोट आता पाकिस्तानमध्ये आहे. सम्राट अकबराचा तिथे जन्म झाला होता असे इल्स सांगते. पण त्यावेळेस ते मारवाडमध्ये होते. नंतर तो तिला पाबुजी राठोडचीच गोष्ट सांगतो.

(क्रमश:)

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकात...)

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल,
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६


●●●



आत्मविश्वास हा यशाचा खरा मार्गदर्शक आहे.

# 'संगीत बावनखणी'चा नवा प्रयोग : एक रुपवंत देखणी स्मृतिपूजा

*विद्याधर गोखले यांच्या 'संगीत बावनखणी' या नाटकाबद्दलच्या काही आठवणी या प्रस्तृत लेखात जीवंत झाल्या आहेत. - संपादक*




कालच महालय समाप्ती झाली आणि गेला आठवडाभर मनात असलेला एक विषय गतीने लिहायला बसलो.

स्मरण अनेक वाटांनी करता येतं, केलं जातं. चित्र मांडलं जातं, पुष्पं वाहिली जातात, आठवणींच्या ठिपक्यांनी रांगोळी काढली जाते अशा किती किती तऱ्हा. ह्या साऱ्याच स्मृतिपूजा.

पण अनेकदा पेच असा पडतो, कोणती पूजा अधिक अन्वर्थक.. सार्थकी लागणारी ठरेल...? प्रयत्न, हट्ट तर तशीच पूजा आपल्याकडून घडावी असा असतो.

मग ह्या पेचातून ज्ञानेश्वर माउली वाट दाखवतात. भावार्थ दीपिकेच्या अठराव्या अध्यायात माउली सांगतात:

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागीं ।। १८-९१७ ।।

भगवंत स्वत:विषयीच सांगताहेत त्यामुळे त्याविषयी संशयाला जागाच उरत नाही, निश्चितीचा निर्वाळाच आहे. भक्ताने स्वकर्माच्या पुष्पांनी केलेली पूजा भगवंताला संतोष देते.

परंपरा असंही सांगते की, 'शिवोऽभूत्वा शिवम् यजेत !' देवाची आराधन देव बनूनच करावी.

ह्या दोन्ही वचनांचा संगमार्थ असाच होतो की, त्या त्या देवाची पूजा तो तो देव होऊन करावी, आणि देवाला स्व-कर्मकुसुमांची पूजा प्रसन्न करते.

स्व-कर्म म्हणजे कुणाची कर्म ?

इथे स्व-कर्माचीही वेगळी अधिक अन्वर्थक संगती लावावीशी वाटते.

भक्ताची कर्म हे तर खरेच.. पण ते अपुरे आहे. त्याही आधी ती त्या आराध्य देवाची.. देवाला प्रिय अशी कर्म म्हणावी लागतील. ती देवाला प्रिय आहेत, म्हणूनच भक्तांनी स्वीकारली आहेत. इथे दोघांचेही 'स्व' एकाकार झालेले दिसतील. आणि मग ते पूर्ण संतुष्टी देतील ह्यात नवल ते कोणते ?

तर पूजेचा हा धागा उलगडत गेला तो स्मृतिपूजेतून.. तिकडे पुन्हा वळू या.

दि. २६ सप्टेंबर.... हा दिवस संगीत रंगभूमीच्या संदर्भात आधुनिक अण्णासाहेब, केसरीकार लोकमान्य-खाडिलकर, काळकर्ते परांजपे यांचा वारसा सांगणारे निस्पृह पत्रकार, गावोगावी शैलीदार मांडणीने सभा रंगविणारे वाग्विलासी वक्ता अशा परिचयाचं इंद्रधनुष्य लेवून दीर्घकाळ महाराष्ट्रीय समाजजीवनात वावरलेल्या विद्याधर गोखल्यांचा अठ्ठाविसावा स्मृतिदिन. योगायोगाने दिवंगत आप्तसुहृदांच्या सश्रद्ध स्मरणाच्या पाक्षिक कालावधीतच हा स्मृतिदिन आला. त्या न्यायानेही गोखलेअण्णांचं स्मरण करणं सार्थ ठरतं.

गोखलेअण्णांच्या स्मृतिदिनी माउलींनी

सांगितलेल्या रीतीनेच पूजन झालं... ते सार्थकता देणारं.. समाधान देणारं होतं. म्हणजे कसं..? ते पहा.

गोखलेअण्णांचं व्यक्तिमत्त्व बहुपैलू होतं. प्रत्येक पैलू मोठा रसरशीत होता, मनोहर होता, जनप्रिय होता. पण एखादा देखणा वृक्ष असावा, त्याचा आकार, शाखाविस्तार, पर्णसंभार, छायामंडप, पुष्पबहार आणि फलाभार हे सारं सारं क्रमाक्रमाने चित्त वेधून टाकणारं, अधिकाधिक मोहून टाकणारं असतं. त्याला पाहणारे, त्याच्या शीतल छायेत विसावणारे, गंधमोहिनीने भारावणारे अनेक असतात. पण तिथून निघताना तो वृक्ष तिथेच ठेवून निघावे लागते. निघाल्यावरही ते दृश्य, तो सौरभ सोबत करतो. पण तोही अल्पकाळच. प्रत्यक्षरूपाने थोडी अधिक सोबत देऊ शकतात ती फळे. ती रूप, गंध, रसाचा अनुभव देतात. म्हणून सारं झाड, त्याची सारेच घटक प्रिय असतात तरी फळे अधिक प्रिय होतात.



तसंच काहीसं आठवणीतील गोखलेअण्णांच्या गुणविविधेचं. अण्णांच्या संगीत नाट्यक्षेत्रातील कर्तृत्वाने जनमानसात दीर्घकाळ नव्हे तर निरंतर स्थान मिळवलं. त्यांच्या नाटकांचे प्रयोग, त्यांनी रचलेली नाट्यपदे सर्वांना नित्य सोबत करतात. केवळ ऐकलीच नव्हे तर गुणगुणली जातात इतकी ती सर्वांच्या व्यक्तित्वात खोल उतरतात, जपली जातात.

आणि गोखलेअण्णांच्या स्मृतिपूजेला चैतन्याने फुललेल्या त्यांच्याच 'बावनखणी' ह्या नाटकाच्या प्रयोगपुष्पाने त्यांचं स्मृतिपूजन केलं गेलं त्यामुळेच ते अत्यंत हृदयस्पर्शी झालं.

गोखलेअण्णांनी त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या मुहूर्तावर विद्याधर गोखले संगीत नाट्य प्रतिष्ठानाची निर्मिती करून आपल्या नावाशी संगीत नाटकाची घट्ट गाठ बांधलेली असल्याचं प्रकट केलं होतं. समर्थांनी आपल्या सेवकांना दासबोधात आपलं रूप पहायला सांगितलं तसंच काहीसं अण्णा आपल्या वारसदारांना (कुलज आणि वृत्तीधर... दोहोंना) संगीत नाटकात आपला जीव गुंतलेल्याचं व्यक्त करताना दिसतात.

म्हणूनच त्याच प्रतिष्ठानच्या पदविका वर्गात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून नाटक बसवून घेणं, आणि तोच प्रयोग अण्णांच्या स्मृतिदिनी सादर करणं मला विशेष औचित्याचं वाटलं. ह्या प्रयोगाचं नव्याने रंगावृत्ती करीत श्रीकांत दादरकरांनी दिग्दर्शन केलं. श्रीकांत दादरकर हे नाव आपल्याला गायक, संगीत रंगभूमीवरील नायक म्हणून परिचित आहे. प्रतिष्ठानाच्या प्रशिक्षण वर्गात विद्यार्थीप्रिय प्रशिक्षक अशीच त्यांची ओळख आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाने ह्या वर्षी अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्काराने गौरविलेल्या विद्याधर गोखले कन्या शुभदा दादरकर ह्यांचं संगीत रंगभूमी क्षेत्रातील विविधरंगी कार्य सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांच्या त्या अथक आणि सार्थक धडपडीत त्यांचे पती असलेल्या श्रीकांत दादरकरांची मौलिक साथ असल्याचंही सर्वांनी पाहिलं आहे. अशा गोखलेअण्णांच्या जावयाने केलेलं हे एक वेगळं श्रद्धापूजनच म्हणावं लागेल.

दि. २६ सप्टेंबरला दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकातील प्रशस्त नाट्यगृहात दुपारी ४.३० वाजता सादर झालेला 'बावनखणी'चा प्रयोग विलक्षण रंगला.

पण पहिली टाळी नाट्यनिवडीला आणि पाठोपाठ बरोब्बर चार वाजून तीस मिनिटांनी वाजलेल्या तिसऱ्या

घंटेला आणि नांदीगायनाला द्यायला हवी. कालमापनात वेळेचं वर्णन भारतीय प्रमाणवेळ असं केलं जातं. पण काही नतद्रष्ट भारतीयांनी अनावश्यक, अपराध मानावा अशा विलंबाचंच 'इंडियन टाईम' असं निर्लज्ज नामकरण केलं आहे. इथेच वर्षानुवर्षे कोणत्याही अडचणीला न जुमानता आपले प्रयोग वेळेवर सादर करणाऱ्या नटश्रेष्ठ भालचंद्र पेंढारकरांचं स्मरण होतं आणि नाट्यमंदिरातील वेळेचं नामकरण 'ललितकलादर्श वेळ' असं करायला हवं असं सुचवावंस वाटतं. तसंही 'बावनखणी' नाटकाशी अण्णा पेंढारकर आणि 'ललितकलादर्श'ची गर्भरेशमी गाठ बांधलेली आहे. संस्था आणि अण्णांचीही ही अखेरची नाट्यनिर्मिती. संस्थेच्या अमृतवर्षातील ही रुपवंत देखणी प्रस्तुती. दि. ३१ जानेवारी १९८३ च्या संध्याकाळी शिवाजी मंदिरात 'वंदन रतिरमणा...' हे नांदीचे सूर दरवळले आणि मदनाची मंडई वा संगीताची सराई नव्हे तर कामदेवाची यज्ञभूमी म्हणावी अशी बावनखणी दाखविणारा रसिक राखणदार, नृत्यसंगीताचा जाणकार म्हणविणाऱ्या खंडोशंकराच्या भूमिकेत भालचंद्र पेंढारकर रंगमंचावर प्रवेशले..

त्यामुळे आजचं श्रद्धास्मरण द्विदल होतं, दोन अण्णांचं होतं. शब्दाचं आणि सुरांच होतं. विद्येचं आणि कलेचं होतं. पण दले दोन असावीत आणि देठ एक असावा अशा एकात्म तपश्चर्येचं होतं. वा संगीतनाट्य रागिणीचे दोन अण्णा हे वादी-संवादी स्वर असावेत आणि जणू त्याच रागिणीचं चैतन्यमय गुंजन 'बावनखणी'च्या प्रयोगातून सव्वादोन तास गुंजत राहिलं होतं.

'बावनखणी' नाटकावर म्हणजे संहितेवर खरं तर गोखल्यांच्या एकूणच नाट्यलेखनावर स्वतंत्रपणे लिहिलंच गेलं नाही. संगीताच्या प्रभावात शब्दसमीक्षेकडे काहीसं दुर्लक्ष झालं. आणि एकूणच संगीत रंगभूमीवरील नाटकांवर, विशेषतः आधुनिक संहितांवर साहित्य-समीक्षकांनी अपवादानेच लिहिलं आहे. कधी एकाधिक कलाप्रयोजनामुळे महत्ता लक्षात न आल्याने तर कधी मत्सरामुळेही तसं झालं असावं. पण ह्या नाट्यसंहितांवर सविस्तर लिहिलं जायला हवं होतं. पुढे कधीतरी लिहायला हवं, लिहीनही.

'बावनखणी' नाटकाच्या पुस्तकाला चित्रकार-समीक्षक आणि ह्या नाटकाचे नेपथ्यकार द. ग. गोडसे ह्यांची अभ्यासपूर्ण दीर्घ प्रस्तावना आहे. पण ती संहितेवर नसून बावनखणी ह्या संकल्पनेवर आहे. पण आज नाट्यप्रयोगाच्या आरंभी नांदी ऐकताना नेहमी जाणविणारं एक वैशिष्ट्य आजही प्रकर्षाने जाणवलं तेवढं इथेच नोंदवायचा मोह होतो आहे.

गोखलेअण्णांनी लिहिलेल्या नांदीच्या रचनांपैकी 'जय जय गौरीशंकर'तील सप्तसूर झंकारित बोले गिरीजेची वीणा आणि 'शाबास बिरबल शाबास' ह्या नानासाहेब शिरगोपीकरांच्या नाटकातील विश्वनाट्य सूत्रधार तूची श्यामसुंदरा दोन रचना विशेष लोकप्रिय आहेत. नांदी परंपरा पाहिली तर ध्यानात येईल की, नाटकाच्या खेळाच्या प्रारंभी केलेलं ते नटेश्वर भगवान शिवशंकरांचं स्तवन असतं. आणि त्या कवितेत नाट्यकथानकाचं सूचनही असतं.

पण गोखलेअण्णांनी नांदीपदांतही आशयात्मक प्रयोग केलेले दिसतील. त्यासंबंधीही कधीतरी लिहायचं मनात आहे. वर उल्लेखिलेल्या विश्वनाट्य सूत्रधार तूची श्यामसुंदरा ह्या नांदीत रंगनाथ श्रीकृष्णाचं वर्णन आहे. तर 'बावनखणी' च्या नांदीत भगवान शंकरांनी क्रोधित होऊन ज्याला भस्मसात केले त्या मदनाचं स्तवन आहे, मदनवंदनाच आहे ती. त्या नांदीचे शब्दच पहा ना..

वंदन रतिरमणा मनहर कामदेव मदना
नसुनी शर ते खरतर त्याचे जिंकी जो भूवना ।।

---

जरी जाळिले सदाशिवाने
अनंग होऊन त्या वीराने
रंगविले शतरंग उधळुनी रसिक-रंग-सदना ।।

याचे सुटता तीर सणासण
वदति तपोधन व्याकुळ होऊन
'जळो जळो ते जपतप-साधन, मिळो चंद्रवदना'।।

ह्या नांदीपासूनच 'बावनखणी'चा प्रयोग विलक्षण रंगत गेला. ह्या नव्या खेळातील आटोपशीर तीन पातळ्यांचे (लेव्हल्स) नेपथ्य पाहताना ते आरंभीचे नव्या नवलाईचे प्रयोग पाहिलेल्या रसिकांच्या दृष्टीसमोर चाळीस वर्षांपूर्वीची रुपवंत देखण्या निर्मितीची स्मृतिचित्रं फेर धरल्यास नवल नाही. तसे प्रेक्षक खूपच अल्प होते पण होते. मीही त्यातलाच एक होतो. आणि एक विशेष व्यक्ती प्रेक्षागृहात उपस्थित होती. अरविंद पिळगांवकर हे ज्येष्ठ गायक-अभिनेते आज आवर्जून उपस्थित राहिले होते. त्यांनी शुभारंभाच्या प्रयोगात काम केलं होतं इतकंच नव्हे तर सारी निर्मितीप्रक्रिया अत्यंत जवळून, त्याचा एक महत्त्वाचा घटक बनून पाहिली, अनुभवली होती. नंतर ज्ञानेश पेंढारकर खंडोशंकरची भूमिका करू लागल्यावरही ते नाटकात होतेच. ते अतिशय भावूक झाले होते. पहिले दिग्दर्शक नंदकुमार रावते यांची त्यांना आठवण येत होती. रावते तसे गद्य रंगभूमीवरचे गुणी दिग्दर्शक पण त्यांनी 'बावनखणी' चा सूर छान पकडला, प्रयोगभर खेळवला. संगीतकार यशवंत देवांनी चाली केल्या. त्याचेही पिळगांवकर साक्षीदार होते. उभ्या उभ्याच बोलताना त्यांनी आणखी एका व्यक्तीची आठवण काढली. प्रत्यक्ष नाटकात भूमिका नसलेल्या मालती पेंढारकर तालीम सुरू असताना सर्वांसाठी जेवण आणत असत. नाटक रंगतदार अशा अनेकांमुळे होतं, त्यापैकी कुणी मंचावर असतं.. कुणी नसतं.

नेमक्या वेळेत आणि दोन अंकांत नाटक करण्यासाठी श्रीकांत दादरकरांनी रंगावृत्ती करताना बऱ्यापैकी संतुलन साधलं होतं. प्रयोगाची लांबी कमी केली पण उंची तसूभरही कमी केली नाही. दोन प्रवेशातील अंधारकाळ अल्प होते. सर्वच कलावंतांनी आपापल्या भूमिका सुरेख सादर करून समर्पक पात्रयोजनेचं श्रेय दादरकरांना मिळवून दिलं. विशेषतः खंडोशंकर, चंद्रा, सुखदेव-बाजीराव, श्रीधर-मोरशास्त्री ह्या गौतम कामत, मैत्रेयी नायक, धवल भागवत, अभिजित कासखेडीकर ह्या कलावंतांनी रंगविलेल्या भूमिका त्यांच्या संवाद, गायन आणि वावरातून सजीव झालेल्या दिसल्या. ज्ञानेश पेंढारकरांनी पदं उत्तम बसवून घेतली आहेत. केदार भागवत आणि सुहास चितळे ह्यांची साथ संगतही रंगत वाढविणारी अशीच झाली.

ज्ञानेश्वर माउलींनी अशा तोषविणाऱ्या पूजेची फलश्रुतीही सांगून ठेवली आहे.

म्हणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें ।
वैराग्यसिद्धि देईजे । पसाय तया ।। १८-९१८ ।।

अशा स्मरणपूजेने संतोष पावल्यामुळे , रिझवणूक झाल्यामुळे प्रसादरूप पसाय प्राप्त होतं. ते श्रीकांत दादरकर, त्यांचे गुणाढ्य विद्यार्थी कलावंत, अरविंद पिळगांवकर, ज्ञानेश-नीलाक्षी पेंढारकर, सुवर्णा घैसास, किरण डोके आदी ह्या नाटकात ह्या आधी काम केलेल्या आणि आज बाहेरून प्रयोग अनुभविणाऱ्या कलावंतांना तर ते मिळालेच असेल. पण ह्या स्मृतिपूजनाच्या सर्वच साक्षीदार प्रेक्षकांनाही ते मिळाले आहे असं धन्यतेने म्हणावंसं वाटलं.

श्रीकांत दादरकर चमूचं हार्दिक अभिनंदन..

**– प्रमोद वसंत बापट**

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### रसायनशास्त्र विभाग

दि.०३.१०.२०२४ रोजी रासायनिक तंत्रज्ञान संस्था, माटुंगा (Institute of Chemical Technology) येथे प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी डॉ. संदीप मोरे यांनी विद्यार्थ्यांना रासायनिक यंत्रणा आणि प्रतिक्रियांचा अभ्यास याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये प्रथम वर्ष विज्ञान शाखेचे एकूण ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



### वनस्पतीशास्त्र विभाग

दि.०४.०९.२०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागामध्ये वन्य भाजी महोत्सव आयोजित केला होता. शाश्वत आरोग्यासाठी रानभाज्या किती महत्त्वाच्या असतात याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी डॉ. वि. एम. जमदाडे, डॉ. एस. अग्निहोत्री, डॉ. जे. जगताप, तसेच आर. एन. ओझरे यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी विकास रासम, सुधीर राऊत व राजेंद्र आंबोरे (शिक्षकेतर कर्मचारी) यांनी सहकार्य केले. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागाचे ७८ विद्यार्थी व ७ प्राध्यापक उपस्थित होते.



दि. ०४.०९.२०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागामध्ये 'जैवविविधता संवर्धन' यावर लघुपट विद्यार्थ्यांना दाखविला. जैव विविधता याचे आपल्या जीवनामध्ये किती महत्त्व आहे हे या लघुपटातून दाखविण्यात आले. यावेळी डॉ. वि. एम. जमदाडे, डॉ. एस. अग्निहोत्री, डॉ. जे. जगताप, तसेच आर. एन. ओझरे यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी विकास रासम, सुधीर राऊत व राजेंद्र आंबोरे (शिक्षकेतर कर्मचारी) यांनी सहकार्य केले. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागाचे ७८ विद्यार्थी व ७ प्राध्यापक उपस्थित होते.

वनस्पतीशास्त्र विभागाने दि.२३.०९.२०२४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी; तसेच कोपरखैरणे नर्सरी, नवी मुंबई येथे भेट दिली. यावेळी विद्यार्थांना 'कृषी आणि बागायती उत्पादन' याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. वि. एम. जमदाडे, डॉ. एस. अग्निहोत्री, डॉ. जे. जगताप तसेच आर. एन. ओझरे यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी विकास रासम व राजेंद्र आंबोरे (शिक्षकेतर कर्मचारी) यांनी सहकार्य केले. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागाचे ४० विद्यार्थी व ६ प्राध्यापक उपस्थित होते.

**३ ऑक्टोबर २०२४ ते ११ ऑक्टोबर २०२४ : ग्रंथालय विभागातर्फे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित उपक्रम : साहित्याच्या माध्यमातून पुरुष वर्गाने केलेला स्त्रीशक्तीचा जागर –**

दिवस पहिला : ३ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : कोल्हाट्याचं पोर





दिवस दुसरा : ४ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : सन २०१७
ओळख कर्तृत्त्ववान महिलांची



दिवस तिसरा : ५ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : इंदिरा : अंतिम पर्व



दिवस चौथा : ६ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : अनुभवाची शिदोरी : आमची माई




दिवस पाचवा : ७ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

दिवस सहावा : ८ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : कर्तृत्ववान स्त्रियांची यशोगाथा



दिवस सातवा : ९ ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : Kalpana Chawala : A Complete Biography



दिवस आठवा : १० ऑक्टोबर २०२४
पुस्तक परिचय : लोकमाता अहिल्याबाई



दिवस नववा : ११ ऑक्टोबर २०२४

पुस्तक परिचय : Lata Mangeshkar : A Life in Music



दिनांक ११.११.२०२४ रोजी मोलाना अब्दुल कलाम आझाद दिनांक १४.११.२०२४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू आणि बिरसा मुंडा जयंती, दिनांक १९.११.२०२४ रोजी इंदिरा गांधी जयंतीनिमित्त ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी सर्व मान्यवरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. तसेच त्यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



दिनांक २६.११.२०२४ रोजी संविधान दिवस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरा करण्यात आला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिवसाचे महत्त्व सांगितले.



**संख्याशास्त्र विभाग**

संख्याशास्त्र विभागातर्फे २३ नोव्हेंबर २०२४ आयटी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्र यामधील अंतर कमी करण्या अभिमुखता व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी राहुल धाराशिवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रावेअर सोल्यूशन एलएलसी; श्री पांडुरंग रंजाळकर, तांत्रिक संचालक, ओरॅकल आणि श्रीमती वृषाली रंजाळकर, तांत्रिक वास्तुविशारद, एक्सेंचर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयटी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्र यांच्यातील दरी कमी करणे, विद्यार्थ्यांना आयटी उद्योगच्या वास्तवाची झलक देणे, हा या व्याख्यानाचा उद्देश होता. यावेळी संख्याशास्त्र, संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि गणित विभागाचे १०७ विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**७ नोव्हेंबर २०२४ – वकिलांसाठी अकाउंटन्सी वर कार्यशाळा –**

वकिलांसाठी त्यांच्या स्वत:च्या कायदेशीर संस्था चालवतात किंवा भागीदारी संरचनांमध्ये गुंतलेले असतात, लेखा ज्ञान प्रभावी आर्थिक नियोजनात मदत करते. आर्थिक स्टेटमेन्ट समजून घेणे, रोख प्रवाह विश्लेषण आणि बजेटिंग वकिलांना त्यांच्या व्यवसाय ऑपरेशन्स, गुंतवणुकीच्या संधी आणि संसाधन वाटप याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. वकिलांसाठी

बुककीपिंग त्यांना क्लायंटच्या व्यवसायातील विविध व्यवहार समजून घेण्यास मदत करते. योग्य आर्थिक नियोजन हे सुनिश्चित करते की, कायदे कंपन्या आर्थिकदृष्ट्या स्थिर आणि टिकाऊ राहतील, ज्यामुळे त्यांना त्यांच्या ग्राहकांना दीर्घकाळात चांगली सेवा देता येईल.

त्याच अनुषंगाने आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंगचा एक घटक म्हणून, महाविद्यालयाने ७ नोव्हेंबर रोजी 'वकिलांसाठी अकाउंटन्सी' या विषयावर विशेष ऑनलाईन व व्याख्यान आयोजित केले होते. सहाय्यक प्रा. श्री. नीतिन पागी, एमकॉम सीएस (सीए), जे सध्या व्हीपीएमच्या जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे येथे कार्यरत आहेत, यांनी विशेष व्याख्यान दिले. या व्याख्यानाचा मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

वकिलांसाठी त्यांच्या स्वत: च्या कायदेशीर संस्था चालवतात किंवा भागीदारी संरचनांमध्ये गुंतलेले असतात, लेखा ज्ञान प्रभावी आर्थिक नियोजनात मदत करते. आर्थिक स्टेटमेन्ट समजून घेणे, रोख प्रवाह विश्लेषण आणि बजेटिंग वकिलांना त्यांच्या व्यवसाय ऑपरेशन्स, गुंतवणुकीच्या संधी आणि संसाधन वाटप याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. वकिलांसाठी बुककीपिंग त्यांना क्लायंटच्या व्यवसायातील विविध व्यवहार समजून घेण्यास मदत करते. योग्य आर्थिक नियोजन हे सुनिश्चित करते.

**संविधान दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम –**

विद्या प्रसारक मंडळाच्या टी. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या वतीने दिवाळीच्या सुट्टीत पाच दिवसीय विधी जागृती अभियान राबविण्यात आले. यामध्ये सायबर गुन्हे, मत अधिकाराचा वापर आणि संविधानास ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मूलभूत कर्तव्याची जाणीव करून देणे हा मुख्य उद्देश ठेवण्यात आला होता. महाविद्यालयाच्या लिगल एड सेलच्या माध्यमातून ३० ऑक्टोबर रोजी आभासी पद्धतीने पोलिस निरीक्षक श्री राम गोपाल व सहा. प्रा. विनोद एच वाघ यांनी सायबर गुन्हे यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच संविधानाच्या अनुच्छेद ५१-अ प्रमाणे असलेल्या मूलभूत अधिकार व भारतीय निर्वाचन आयोग यांनी पारित केलेली मत अधिकाराची शपथ याचा ही परिचय यावेळेस देण्यात आला. विद्यार्थ्यांना दिनांक २ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर २०२४ या दरम्यान आपआपल्या सोसायटीमध्ये, तसेच भागामध्ये जाऊन सायबर गुन्हे, मुलभुत कर्तव्य व मताधिकाराचे महत्त्व सांगायचे होते. दिवाळीच्या सुट्टीत नागरीकांना या माध्यमातून शुभेच्छा द्यायचा हा उपक्रम महाविद्यालयाने यावेळी हाती घेतला होता.

**दि. १८ नोव्हेंबर २०२४ – मतदान जनजागृती**

विद्या प्रसारक मंडळाच्या टी. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या मतदार साक्षरता केंद्राच्या माध्यमातून ठाणे शहरातील नागरिकांना येत्या निवडणुकीत धर्म, जात, वंश याचा विचार न करता लोकशाही बळकट करण्यासाठी मताच्या अधिकाराचा उपयोग करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला. यावेळी ठाणे पश्चिम येथील सिडको बसस्टॅन्ड व रेल्वे स्थानक इथे नागरिकांना 'मताच्या अधिकाराचे महत्त्व व लोकशाहीतील त्याची आवश्यकता' या विषयावर जागृती करण्यात आली. यावेळी मतदार साक्षरता केंद्राचे प्रभारी हेतल मशेरी, प्रा. विनोद एच. वाघ, प्रा. यतीन पंडित, प्रा. शिवाजी बिबे व प्रा. प्रेरणा वसावे यांनी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या नेतृत्त्वाखाली हा जागृती कार्यक्रम पार पाडला. यावेळी निवडणूक आयोगाद्वारे पारित केलेली शपथ घेण्यात आली. महाविद्यालयाचे मतदार साक्षरता केंद्र

हे नेहमीच मतदार जागृतीसंबंधी कार्यक्रम आयोजित करत असते. यामध्ये मतदार नोंदणीच्या मार्गदर्शनापासून ते 'लोकशाहीतील निवडणुकीचे महत्त्व' अशा विषयावर अंतर्गत कार्यशाळा घेणे याचा समावेश आहे. महाविद्यालय हे 'निवडणुकीसंबंधी कायद्यावर' तीन महिन्यांचा कोर्स देखील आयोजित करते.




**विद्या प्रसारक मंडळाचे टी.एम.सी. विधी महाविद्यालयातील विशेष मार्गदर्शन लेक्चरवर अहवाल**

**प्रस्तावना:**

विद्या प्रसारक मंडळाचे टी.एम.सी. विधी महाविद्यालय, ठाणे, ने विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी आणि परीक्षेसाठी पुनराभ्यास व विशेष मार्गदर्शन उपक्रमाचा भाग म्हणून विविध विषयांवर तज्ज्ञांचे लेक्चर आयोजित केले. हा उपक्रम ९ नोव्हेंबर २०२४ पासून १३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राबविण्यात आला.

**९ नोव्हेंबर: मालमत्ता हस्तांतरण कायदा**

या दिवशी मालमत्ता हस्तांतरण कायद्यावरील लेक्चर घेण्यात आले. या सत्राचे मार्गदर्शन डॉ. रुपाली जमोडदे यांनी केले. त्यांनी मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या विविध प्रकारांवर (जसे की विक्री, गहाण, भाडेपट्टी, गिफ्ट, विनामूल्य हस्तांतरण) सविस्तर माहिती दिली. तसेच, भारतीय कायद्यांतील मालमत्ता हस्तांतरणाच्या तरतुदींचा अभ्यास कसा करावा यावर विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली.

**११ नोव्हेंबर: शासकीय कायदे**

श्री. विनोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय कायद्यांवरील लेक्चर झाले. त्यांनी शासकीय कायद्यांचे स्वरूप, त्यांचे महत्त्व, तसेच स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील कायद्यांचे प्रभाव यावर सखोल माहिती दिली. 'शासकीय धोरणे आणि कायद्यांच्या अंमलबजावणीतील अडचणी' यावर विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यात आली.

**१३ नोव्हेंबर: कंपनीविषयी कायदे**

या दिवशी श्री. शिवाजी बिबे यांनी कंपनी कायद्यांवरील मार्गदर्शन दिले. त्यांनी भारतीय कंपनी कायदा, २०१३ (Companies Act, 2013) मधील महत्त्वाच्या कलमांचा ऊहापोह केला. त्यात कंपनीची नोंदणी, संचालकांचे अधिकार व कर्तव्ये, तसेच कंपन्यांच्या आर्थिक जबाबदाऱ्यांवर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी कंपनी कायद्यांच्या अंमलबजावणीच्या प्रॅक्टिकल बाबींबद्दल अनेक प्रश्न विचारले.

**निष्कर्ष:**

या विशेष मार्गदर्शन सत्रांमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील कठीण विषय समजून घेण्यास मदत झाली. तज्ज्ञांनी दिलेल्या प्रात्यक्षिक उदाहरणांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला व परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन मिळाले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कायद्यांच्या व्यावसायिक आचार-विचारांचा अनुभव मिळतो, जो त्यांच्या करिअरसाठी मोलाचा ठरतो.

---

**२५ नोव्हेंबर २०२४ – राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा**

(भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त व्ही. पी. एम. चे टि. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे आणि कायदेशीर मदत कक्षाने आयोजित केलेली स्पर्धा)

ठाणे येथील व्ही. पी. एम. च्या टी. एम. सी. विधी महाविद्यालयाने 'माझे संविधान, माझी कर्तव्ये' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वा. आयोजित केली होती. या स्पर्धेला संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला व स्पर्धा यशस्वीपणे पार पडली.

**कार्यक्रमाचे अवलोकन:**

या स्पर्धेचे उद्दिष्ट सहभागींना भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या मूल्यांवर आणि घटनात्मक कर्तव्यांचे पालन करण्याच्या त्यांच्या भूमिकेवर चिंतन करण्यासाठी प्रेरित करणे होते. कायद्याच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वक्तृत्व कौशल्य दाखवण्यासाठी, तसेच न्याय आणि जबाबदार समाजाच्या संवर्धनासाठी राज्यघटनेचे महत्त्व समजण्यासाठी त्यांना या स्पर्धेच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

संपूर्ण महाराष्ट्रातील विविध प्रतिष्ठित व नामांकित महाविद्यालयातील स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला, ज्यामुळे ही खरोखरच राज्यस्तरीय स्पर्धा ठरली. सामग्री, सुसंगतता, वितरण आणि एकूण प्रभाव या पॅरामीटर्सवर स्पर्धकांचे व त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन केले गेले.

**विजेते :**

**प्रथम पारितोषिक : न मॉरीन मॅथ्यू**
जी. जे. अडवाणी कॉलेज ऑफ लॉ, मुंबई

**द्वितीय पारितोषिक : परि मिराणी**
प्रवीण गांधी लॉ कॉलेज, मुंबई

**द्वितीय पारितोषिक : मयुरी विष्णू कलान**
व्ही. प्र. मं. चे ठा. म. पा. विधी महाविद्यालय, ठाणे


**तिसरे पारितोषिक :** सार्थक गायकर
श्री ओमप्रकाश मालपानी विधी महाविद्यालय संगमनेर

**ठळक मुद्दे:**

सहभागी स्पर्धकांनी न्यायाधीशांना आणि प्रेक्षकांना त्यांच्या घटनात्मक तत्त्वांची सखोल जाण, स्पष्ट वितरण आणि प्रभावी युक्तिवादाने प्रभावित केले. प्रत्येक सहभागी स्पर्धकाने अनोखे दृष्टीकोन आणले, जे विचारांची विविधता आणि नागरी जबाबदारीची बांधिलकी दर्शविते.

कार्यक्रमाचा समारोप न्यायाधीशांच्या प्रोत्साहनपर टिप्पण्यांनी झाला, ज्यात त्यांनी सहभागींच्या समर्पण आणि तयारीबद्दल त्यांचे कौतुक केले. भविष्यातील कायदेशीर व्यावसायिकांमध्ये घटनात्मक कर्तव्यांबद्दल जागरूकता वाढवणारी स्पर्धा आयोजित केल्याबद्दल त्यांनी व्ही. पी. एम. च्या टी. एम. सी. विधी महाविद्यालयाचे कौतुक केले.

स्पर्धेचे यश गंभीर, सामाजिक उद्दिष्टांसह तरुणांच्या सहभागाला प्रोत्साहन देणारे व्यासपीठ तयार करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. व्ही. पी. एम. च्या टी. एम. सी. विधी महाविद्यालय भविष्यात असेच उपक्रम आयोजित करण्यास उत्सुक आहे.






## सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार




सहाय्यक प्राध्यापक विनोद वाघ व सहाय्यक प्राध्यापक हेतल मिशेरी यांना ICSI ठाणे चॅप्टरने ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी त्यांचे नामांकन सदर संस्थेस दिले होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### संविधान दिन उत्साहात साजरा

वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालय ठाणे येथील ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत ग्रंथालयातील वाचन कक्ष येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या दिनानिमित्त भारतीय संविधानची प्रत्येकाने शपथ घेऊन प्रास्ताविकेचे वाचन केले. भारताचे संविधान आणि त्यातील मौलिक तत्त्वे, मूलभूत हक्क आणि कर्तव्य याची शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना माहिती व्हावी हा संविधान दिन साजरा करण्यामागचा प्रमुख हेतू आहे.





**संविधान दिन साजरा करताना शिक्षक आणि विद्यार्थी**

संविधान दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी एक मसुदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रानंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा केला जातो.

### अतूट बंध

पॉलिटेक्निकच्या इंस्ट्रुमेंटेशन डिप्लोमा प्रोग्रामच्या पहिल्या बॅचचे (१९८६ pass out) पहिले गुणवत्ताधारक श्री. पिनाकिन गोखले यांनी अलीकडेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पॉलिटेक्निकला भेट दिली.

नंतर त्यांनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (COEP टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी) मधून इन्स्ट्रुमेंटेशन आणि कंट्रोलमधील अभियांत्रिकी पदवी पूर्ण केली.

पॉलिटेक्निकच्या सुविधा आणि उपलब्धी आणि आता त्याचे अभियांत्रिकी महाविद्यालयात रूपांतर झाल्याचे पाहून त्यांना खूप आनंद झाला. प्राचार्य डॉ. डी. के. नायक आणि श्री. पिनाकिन गोखले यांनी पॉलिटेक्निकच्या सुरुवातीच्या दिवसांची आणि त्यावेळची शिकवण्याची आव्हाने यांची आठवण करून देणारे संभाषण केले. तथापि, पॉलिटेक्निकच्या कर्मचाऱ्यांनी त्या वेळी घेतलेले कष्ट आणि प्रयत्न ह्याचे त्यांनी कौतुक केले.

विविध बहुराष्ट्रीय, बहुसांस्कृतिक वातावरणात काम करण्याच्या त्यांच्या जागतिक अनुभवाचा पॉलिटेक्निकला अभिमान वाटतो. ते अनुभवी औद्योगिक नियंत्रण प्रणाली/OT सायबर सुरक्षा व्यावसायिक आहेत ज्यात ३४ वर्षे functional I & C, ऑपरेशन्स, अभियांत्रिकी आणि प्रकल्पांमध्ये नियंत्रण प्रणाली अभियांत्रिकीचे त्यांना कौशल्य प्राप्त आहे. Greenfield, Brownfield, ICS systems आयसीएस सुरक्षा स्थितीचे मूल्यांकन, तसेच सायबर जोखीम मूल्यांकन करण्यात ते तज्ज्ञ आहेत.



त्यांनी विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये प्रमुख पदे हाताळली आहेत आणि पॉलिटेक्निकमध्ये घेतलेल्या शिक्षणाचा सदुपयोग करून अनेक प्रकल्प यशस्वीरित्या हाताळले आहेत.

पॉलिटेक्निक त्यांना पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन यशस्वी होण्याचे अभिष्टचिंतन करते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

दि. २१ नोव्हेंबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी यांची मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या पीएचडीच्या मुलाखत परीक्षेचे (Viva Voce - online open viva) अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दि. २२ नोव्हेंबर २०२४ : ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांना ३१ व्या बिझनेस स्कूल अफेअर आणि देवांग मेहता नॅशनल एज्युकेशन लीडरशिप अवॉर्ड्स तर्फे प्रतिष्ठित अशा 'एज्युकेशन लीडरशिप अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले.






२२ नोव्हेंबर २०२४ : डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजला ३१ व्या बिझनेस स्कूल अफेअर आणि देवांग मेहता नॅशनल एज्युकेशन लीडरशिप अवॉर्ड्सतर्फे प्रतिष्ठित अशा 'राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.




दि. २६ – २७ नोव्हेंबर २०२४ : राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) तर्फे तीन सदस्यांच्या तज्ज्ञ समितीने ब्रिम्सला दोन दिवसांच्या परीक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने भेट दिली. या भेटीमध्ये संस्थेचे संचालक आणि विभाग प्रमुख यांचे सादरीकरण, संस्था आणि आवाराचा दौरा, प्रशासकीय मंडळाचे सदस्य, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या भेटी, चर्चा, आणि अभ्यास, अंदाजपत्रक, खाती, इ. विविध दस्तऐवजांचा आढावा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता आणि ब्रिम्स ही आता NAAC नुसार A दर्जाची संस्था आहे.




दि. २८ नोव्हेंबर २०२४ : सहाय्यक प्रा. अदिती दामले – पवार यांनी विद्यार्थी समुपदेशन कक्षा तर्फे 'थँक्सगिव्हिंग डे' च्या निमित्ताने कृतज्ञता उपक्रमाचे आयोजन केले.

हा केवळ एक उपक्रम न ठरता – एक सांस्कृतिक क्रांती होती : श्रेणीबद्ध अडथळे तोडले गेले : विद्यार्थी आणि शिक्षकांनी पारंपरिक भूमिका पार केल्या, अस्सल प्रशंसा : खऱ्याखुऱ्या पोचपावत्या या मुळे वास्तविक परिवर्तन घडते, संसर्गजन्य ऊर्जा: सकारात्मक स्पंदने ज्याने आपल्या संपूर्ण शिक्षण परिसंस्थेचा आकार बदलला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी त्यांची शैक्षणिक आवड निर्माण करणाऱ्या मार्गदर्शकांचा गौरव केला. प्राध्यापकांनी उदयोन्मुख विद्यार्थ्यांची क्षमता ओळखली. विद्यार्थी समुपदेशन कक्षाने थँक्सगिव्हिंगच्या पलीकडे, एक सहाय्यक, सक्षम शैक्षणिक समुदायासाठी एक रूपरेषा तयार केली.



दि. २९ नोव्हेंबर २०२४ : डॉ. कांचन आणि डॉ. बापट यांना शार्प कन्सल्टन्सी तर्फे त्यांच्या एचआर नेटवर्कसाठी 'DEI–विविधता, समानता आणि समावेश' या विषयावर सत्र आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.




•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.